बेलवलकर हाऊसिंगचे

# ऐसी अक्षरे

ऑगस्ट २०२०



संस्थापक - कै. शरच्चंद्र कृष्ण बेलवलकर

## साहित्यसेवा उपक्रमाचे वर्ष १८ वे : श्राव्य माध्यम अंक १ ला (ऑडिओ बुक)

प्रकाशक : समीर शरच्चंद्र बेलवलकर ● संपादक : पद्मनाभ प्रभाकर हिंगे



**सर्वांगीण उन्नतीसाठी प्रकाश देणाऱ्या हे तेजस्वी साहित्य सरस्वती देवते,**
**तुझी नित्य वाचन चिंतनादी उपासना आमच्या सद्‌बुद्धीला प्रेरणा देवो.**

BELVALKAR HOUSING
प्रत्येक घर शुभंकर

सप्रेम भेट

स्वामित्त्व हक्क / मानधन विषयक संपर्क ०२०-२५४५१६१०

विनामूल्य खाजगी वितरणासाठी

Sarita Vaibhav
BUILDING B9 & B10

# विघ्नहर्ता तू 'गृह' कर्ता!



## पु. ल. देशपांडे उद्यानासमोर, सिंहगड रोड,

**प्रीमियम 2 व 3 BHK**

**फक्त 1.01 कोटींपासून*** (सर्वखर्चसमाविष्ट)

**साईट व्हिजीट करा आणि मिळवा भरघोस सूट**

*नियम व अटी लागू

घर घेण्यातल्या सगळ्या अडचणींपासून महामारीपर्यंत सगळ्या संकटांचा नाश तो करतो म्हणूनच आपण त्याला विघ्नहर्ता म्हणतो. अशा मंगलमूर्ती गणरायांच्या उपस्थितीत आपल्या घराचे बुकिंग करणे म्हणजे अत्यंत शुभंकर योग. तेव्हा हा उत्सवी शुभ काळ चुकवू नका. लगेच सिंहगड रस्त्यावर पु. ल. देशपांडे उद्यानासमोरील निसर्गरम्य सरिता वैभवमध्ये आजच घर बुक करा. मर्यादित फ्लॅट्स शिल्लक.




### सरिता वैभवची वैशिष्ट्ये:

- पुण्यातील मध्यवर्ती ठिकाण
- जागेचा पुरेपूर वापर
- निसर्गाच्या सानिध्यातील प्रकल्प
- पझल पार्किंग
- 300+ आनंदी परिवारांचा शेजार
- 24 x 7 सुरक्षितता

BELVALKAR HOUSING
प्रत्येक घर शुभंकर

बी 9 आणि 10, सरिता वैभव, पु. ल. देशपांडे
उद्यानासमोर, सिंहगड रोड, पुणे - 411 030
www.belvalkarhousing.com

**संपर्क - 90110 10811**

MahaRERA No.: "B9 & B10" - P52100016093 | Available at website: https://maharera.mahaonline.gov.in

प्रकाशक
समीर शरच्चंद्र बेलवलकर
बेलवलकर हाऊसिंग, निर्मिती एमिनन्स,
४ था मजला, ११७५/१, एरंडवणे,
मेहेंदळे गॅरेजजवळ, पुणे ४११ ००४.
संपादक
पद्मनाभ प्रभाकर हिंगे

# ऐसी अक्षरे

प्रत्येक घर शुभंकर

संस्थापक : कै.शरच्चंद्र कृष्ण बेलवलकर
साहित्यसेवा उपक्रमाचे वर्ष १८ वे
(श्राव्य माध्यम अंक १ ला ऑडिओ बुक)
ऑगस्ट २०२०
विनामूल्य खाजगी वितरण ※ अंक विक्रीसाठी नाही
Web: www.belvalkarhousing.com
E-mail : data@belvalkarhousing.com

## अंतरंग


मनोगत — समीर बेलवलकर

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :
https://youtu.be/cm87AIkTCQI

आमचे दोन शब्द — पद्मनाभ हिंगे

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :
https://youtu.be/JwhJpumrEEA

| | | |
|---|---|---|
| चैत्र | जी. ए. कुलकर्णी | ०२ |
| मी पण ज्यांचे गळले हो | शरच्चंद्र बेलवलकर | ०५ |
| आम्ही कोण | केशवसुत | ०७ |
| अनवाणी | व्यंकटेश माडगूळकर | ०८ |
| कुस्करु नका ही सुमने | भास्कर रामचंद्र तांबे | १४ |
| सय पावसाची, लय पावसाची | शरच्चंद्र बेलवलकर | १५ |
| सासू माझी भली | भा. ल. महाबळ | १६ |
| समतेचे हे तुफान उठले | विंदा करंदीकर | २३ |


विनम्र आवाहन : मराठीतील समृद्ध साहित्यसागरात अनेक माणिक–मोती आहेत. ते शोधून नवीन पिढीसमोर 'ऐसी अक्षरे' मधून ठेवावेत असे मनापासून वाटते. अडचण येते ती संबंधित लेखकांच्या अथवा त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या संपर्क पत्त्याची. शक्यतो संबंधित लेखक, कवी, चित्रकार अथवा या साहित्य वा चित्राच्या स्वामित्वाचा उत्तराधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचा आमचा प्रयत्न असतो. मुळात या अंकाचा उद्देश कुठलेही व्यापारी उत्पन्न मिळविण्याचा नसून साहित्यसेवा करण्याचा आहे. या अंकात प्रसिद्ध केलेल्या कथा, लेख, कविता, चित्रे, व्यंगचित्रे पुन्हा मुद्रित करताना कोणाचाही स्वामित्व हक्क आम्ही नाकारत नाही. जुन्या गद्य साहित्यासाठी आम्ही रू. ५००/–, चित्रे व पद्य साहित्यासाठी आम्ही रू. २००/– (प्रत्येकी) मानधन देतो. कृपया संबंधितांनी 'ऐसी अक्षरे' मधून प्रसिद्ध झालेल्या साहित्याच्या, चित्राच्या स्वामित्व हक्कासाठी कार्यालयाशी संपर्क साधणे ही नम्र विनंती.

- अंकातील प्रसिद्ध साहित्य वा चित्रे संबंधितांच्या संमतीशिवाय वापरु नयेत...... संपादक

या मासिकात व्यक्त केलेल्या मतांशी / मजकुरांशी, संपादक / प्रकाशक सहमत असतातच असे नाही.

# चैत्र

– जी.ए.कुलकर्णी

चैत्रात हळदीकुंकू सुरु झाले की रखमाला डोक्यावरुन पदर नीट ठेवायला उसंत मिळत नसे. कारण मग पाच-सात गल्ल्यांत घरोघरी जाऊन ''आज आहे हळदीकुंकू, कचेरीजवळ करंदीकरांकडे तळ्याजवळ देशपांडे रामाच्या देवळाजवळ नाईक, जोशी... फुलबाग गल्लीत हुक्केरीकर... अशी लांबलचक यादी एखाद्या मंत्राप्रमाणे घोळवावी लागे. पण या महिन्यात पायांचा कापूस झाला तरी चोळीच्या दंडकाठात पैसे देखील पुष्कळ जमत. हळदीकुंकू सगळ्यांना मुक्त असे व त्या ठिकाणी जायला ओळख देखील लागत नसे.

आमंत्रण सुरु व्हायच्या आधीच गल्लीतील बायका रेशमी लुगडी, पैठणी कोवळ्या उन्हात टाकत आणि त्यांच्या ठेवणीचा वास घालवत. गोठपाटल्या असल्याच तर सोनाराकडून लाल पूड घालून त्या झगझगीत होत आणि डुकराचे केस असलेल्या कुंचल्यांनी नाथीकुड्या घासल्या जाऊन उजळ होत. ओटीत मिळालेले हरभरे आणि कोशिंबीर ठेवण्यासाठी असलेला डबा घालण्यासाठी दोन दोन पिशव्या लागत. पण चैत्र आला की घरातल्या सर्वात लहान पोराचे मात्र धाबे दणाणते. कारण मग त्याला नथी, फुगलेल्या पैठणी व लुगडी, कुणी कुणाचे ऐकत नसताना एकदम सगळ्याच मोठ्याने बोलणाऱ्या बायका, यांच्या घोळक्यात गुरफटून सतत हिंडत लागे. त्याने कधी मध्येच बोलून चांडेपणा करायचा नसे. हरभरे व कोशिंबिरीचा डबा घेऊन गुमान मागोमाग येणे एवढेच त्याचे काम असे.

पण निदान भटकायला तरी मिळते म्हणून राजू आईबरोबर जात असे. शिवाय अशा वेळी आई देखील निराळी सजलेली दिसे. पण नंतर मात्र महिनाभर हरभऱ्याचीच आमटी खायचा त्याला कंटाळा येत असे. दादा कधी पान खात नसत. पण विड्याची पाने, सुपारी फुकट येत असल्याने त्यांना औषध घेतल्याप्रमाणे दररोज विडा खावा लागे. राजूला कोपराने डिवचत ते म्हणत, ''या बायका मारे नट्टपट्टा करुन भटकून येतात आणि पाने, हरभरे खावे लागतात आम्हांला!''

त्या मंगळवारी रखमाने येऊन लांबलचक यादी उलगडली, तेव्हाच आईची धडपड सुरु झाली होती.

चाराच्या सुमाराला गल्लीतल्या अर्ध्या बायका जमा झाल्या. त्या वेळी ती तयारच होती. त्या जमावात आणखी दोनचार पोरे आहेत हे पाहून राजूला बरे वाटले. मारुती, रामदेव या गल्ल्या हिंडून येईपर्यंतच सहा वाजले. अजून वरची आळी, दुर्गादेवी, दोन पिंपळ हे भाग हिंडायचेच होते. आता राजूची हरभऱ्यांची पिशवी भरली होती आणि कैऱ्या किसून केलेली कोशिंबीर खाऊन त्याचे दात आंबायला आले होते. पण मुख्य म्हणजे अद्याप नाईकांच्या घरी जायचे होते.

नाईकांचे हळदीकुंकू गावात फार प्रसिद्ध होते. तेथे लहान पोरांना देखील पन्हे प्यायला मिळे. त्या प्रशस्त वाड्याच्या मधल्या दिवाणखान्यात आरास होत असे आणि खाली लाल फुले असलेला गालिचा असे. मागे भिंतीला जांभळी पीतांबरे लावून समोर पन्नास झगमगीत समया लावलेल्या असत. रामाच्या देवळातील लाल-हिरव्या-निळ्या हंड्या त्या दिवशी तिकडे येत आणि त्यांच्यामध्ये एक झुंबर हजार रंगांच्या दिमाखात किणकिणत असे.

पण आता संध्याकाळ होत आली होती आणि आईला घरची ओढ लागली होती. पण राजूचा नाइकांकडे जाण्याचा आग्रह कमी होईना. बाकीच्या बायका वरच्या आळीत जाऊन मग नाईकांकडे जाणार होत्या. कारण ते पाहिल्यावर मग इतर ठिकाणी गंमत वाटत नसे.

आई राजूला घेऊन नाईकांच्या घरी आली व गालिच्यावर बसली. राजूने पिशवी खाली उतरवली व अनेक मुलांप्रमाणे थोडे बाजूला बसून तो पन्ह्याची वाट पाहू लागला. नाईक बाई परातीएवढी नथ घालून गोठपाटल्या असलेले गोरे गाल हात हलवत काही बायकांना हळदीकुंकू द्यायला सांगत होती. आणि पैठणी नेसलेली तिची सासू नाईक काकू शेजारीच खुर्चीवर सारे पाहत गप्प बसली होती. आईने बराच वेळ वाट पाहिली, पण तिच्याकडे कुणी येईनाच. तिच्यानंतर आलेल्या बायकांना हळदीकुंकू मिळाले, पोरांनी पन्हे घेतले, पण राजूच्या आईकडे पाहूनही नाईक बाई काही म्हणेच ना.

''हळदीकुंकू देता ना? संध्याकाळ होत आली. मलाही घरी जायचं आहे.'' अखेर आईच संकोचाने म्हणाली.

दोन्ही बाजूंना सोन्याचे हात हलवत नाईक बाई तुरुतुरु आली नथीच्या दाणेदार मोत्यांतून म्हणाली, ''पण बाई, मघाशीच तुम्ही एकदा येऊन गेलात की! हळदीकुंकू सर्वांनाच आहे, पण मूठभर हरभऱ्यासाठी पुन्हा पुन्हा कसलं यायचं ते?''

आई तिच्याकडे पाहतच राहिली. तिचा चेहरा काळसर लाल झाला. ''मी मघाशी आले नाही. मूठभर दाण्यांचा प्रश्न नाही. ती ओटी असते. मग तुम्ही शास्त्रासाठी एक दाणा घाला.'' ती शक्यतो शांतपणे म्हणाली.

नाईक बाईंची सासू खुर्चीवरून उठली. तिचा चेहरा कळवळल्यासारखा झाला होता. ती नाईक बाईला म्हणाली, ''अग दे ना त्यांना ओटी, हळदी-कुंकू! नुसत्या हरभऱ्यासाठी कोण यायला बसलंय आपल्याकडे?''

''छे, मला नाही आवडत हे!'' नाईक बाई म्हणाली. ''तुम्हांला माहीत नाही कशा बायका असतात एकेक या!'' आणि ती पाठमोरी झाली. तिच्या अंबाड्यात तळहाताएवढे सोन्याचे फूल होते.

आई मुकाट्याने उठली व गौरीपुढे गेली. तेथील करंड्यातील हळद-कुंकू तिने देवीवर टाकले व स्वत:च कुंकू लावून घेऊन तिने नमस्कार केला. मग तिने पिशची उचलली व राजूला घेऊन ती बाहेर पडली. राजू आता रडण्याच्या बेतात होता. त्याची मान वर होईना. आपण आग्रह धरला नसता तर आई नाईकांकडे गेलीच नसती असे त्याला सारखे वाटू लागले. शेवटी आईच म्हणाली, ''तुझी काही चूक नाही, गप्प बस. मात्र यातलं घरी काही सांगू नको.'' रात्री हरभे तसेच पिशवीत राहिले आणि कोशिंबीर देखील आईने दादांना दिली नाही. रात्रीची भांडी घासायला निंगव्वा आली, तेव्हा आईने हरभऱ्यातील दोन दाणे व चमचाभर कोशिंबीर देवाच्या कोनाड्यात ठेवली, बाकीचे सारे निंगव्वाला देऊन टाकले.

गुरुवारी सकाळी दादा बाहेर जायच्या तयारीत होते तेव्हा आई बाहेर आली व आपला एक सर, सोन्याचे एक लहान फूल आणि राजूची अंगठी तिने त्यांच्यासमोर ठेवली. ''यांचे पैसे आणायचे.'' ती म्हणाली.

दादांनी सारे जिन्नस गोळा केले व खिशात घातले, पण ते काही बोलले नाहीत.

''पैसे कशाला म्हणून नाही विचारलंत तुम्ही?'' ती पुन्हा म्हणाली.

''मी कशाला विचारू? तसं काही कारण असल्याखेरीज तू पैसे आणणार नाहीस. आतापर्यंत मी नसती चौकशी कधी आहे काय? मग झालं तर. आपण निखाऱ्यावरुन चालत जाणार म्हणून तू मला सांग. मी न बोलता येतो की नाही बघ तुझ्याबरोबर.'' दादा म्हणाले.

आईने मान हलवली. ''उद्या मी हळदीकुंकू करणार आहे. पण या खेपेला नुसतं गल्लीपुरतं नाही. सगळ्यांना मोकळं असं गाव-हळदीकुंकू. म्हणून येताना इतकं सामान यायचं.'' ती म्हणाली. तिने यादीचा एक लांब कागद दादांना दिला.

शुक्रवारी सकाळीच घर अंबाबाईचे देऊन झाल्याप्रमाणे बायकांनी भरुन गेले. गल्लीतील बायकांनी बाहेर हळदीकुंकवाला जायचा विचार सोडला आणि घरीच मुक्काम ठोकला. दादांनी श्रीखंडे वकिलांच्या घरुन मोठे जाजम आणले. सरस्वती फराळाच्या दुकानामधून आतून चांगली कल्हई असलेले पितळी पिंप पन्ह्याकरिता त्यांनी उचलून आणले. घरी हंड्या नव्हत्या. पण नरसूमामाने मुद्दाम एक दिवस रजा काढली आणि संध्याकाळपर्यंत पाठ मोडून रंगीत रांगोळीची चित्रे काढली. त्यानेच येताना दोन लाल रंगीत पाट व चांदीचे तबक आणले होते. नंतर त्याने गडबडीने जाऊन एक फोनोग्राफ आणून ठेवला. हळदीकुंकू तर उत्तम सजले. रखमाने जाऊन सगळीकडे आमंत्रणे दिली. नंतर ती स्वत: कट्ट्यावर बसली व येणाऱ्या जाणाऱ्याला पाणी लागेल म्हणून एक घंगाळे भरुन ठेवून तिने ते शेजारी ठेवले. आता दादांना, नरसूमामाला घरी जागाच नव्हती. आईने त्यांना स्पष्ट सांगितले, ''बाहेर जा आणि सावकाश नऊ वाजता घरी या.''

बाहेर जाण्यापूर्वी दादा राजूला कोपर ढोसून म्हणाले, ''हळदीकुंकू तुझ्या आईचं, पन्हं पीत बसणार तू आणि भटकून पाय जाणार ते मात्र माझे बघ!''

मग बायकांची गर्दी होऊ लागली. पन्ह्याचे लहान ग्लास भरुन देताना राजूची आणि ते धुऊन पुन्हा तयार ठेवताना नरसू-मामाच्या शांतीची तारांबळ उडून गेली. आईने आज आपली एकुलती पैठणी काढली होती आणि तिची नथ लहान धुतल्या बारीक तांदळासारख्या मोत्यांची होती. साडेसात वाजता गर्दी थोडी कमी झाली. पण आई सारखे दाराकडे बघत होती. तिने रखमाला खोदून खोदून विचारले, ''नाईकांच्या घरी आमंत्रण गेलं ना?'' तर रखमा कपाळावर हात मारुन घेत म्हणाली, ''अवो बाई, आता काय सांगू? जातानाचं एकदा, येतानाचं एकदा. दोनदा जाऊन वरडले मी तिथं.'' आईचा चेहरा आता दमलेला, हिरमुसलेला दिसत होता. तोच दारात टांगा थांबला. स्वच्छ पातळ नेसलेली नाईक काकू त्यातून उतरली व आत आली. पण आईचे लक्ष तिच्या मागे होते. तिच्या मागून नाईक बाई येताच आईचे डोळे स्वच्छ आरशासारखे झाले आणि तिचा चेहरा चिंचपाण्याने घासलेल्या गौरीसारखा उजळला. ती आत गेली व तिने दोन रंगीत पाट आणले. स्वत: तिने त्याच्याभोवती रांगोळी काढली व त्यांना बसायला सांगितले. ''तुमच्याकडे होय हळदीकुंकू? मला माहीतच नव्हतं.'' नाईक बाई म्हणाली. पण त्यानंतर ती एकही शब्द बोलली नाही. सारा वेळ ती टांगलेल्या दह्याच्या गाठोड्यासारखा चेहरा घेऊन गप्प होती. आईने त्यांना अत्तर लावले, हळदकुंकू दिले आणि चांदीच्या तबकाने त्यांची भरभरुन ओटी भरली. सारे झाल्यावर तिने दोघांनाही वाकून नमस्कार केला. मग ती आत आली व राजूला म्हणाली, ''राजू, त्यांना पन्हं नेऊन दे.''

राजूचा राग अद्याप गेला नव्हता. त्या नाईक बाईला तर त्याला पन्हे बिलकुल द्यायचे नव्हते. त्याने हट्टाने मान हलवून

नाही म्हणून सांगितले. पण आईने डोळे वटारताच तो सैल झाला व त्याने निमूटपणे ग्लास बाहेर आणला. नाईक बाईने घाईने ग्लास रिकामा केला व ती बाहेर जाऊन उभी राहिली. नाईक काकूने मात्र पन्हे सावकाश संपवले व ती आता येऊन आईला म्हणाली, ''माझी सर्वात धाकटी मुलगी तुमच्या वयाची असेल, पण ती तुमच्या पाया पडते. मनात काही तळपट ठेवू नका. माझे आता दिवस फार थोडेच उरले. माझ्या डोळ्यांसमोर तरी घरात काही बरंवाईट व्हायला नको. मी स्वत: तीस वर्षं हळदीकुंकू केलं, पण घरात आलेली सुवासिनी कधी तशीच परत गेली नाही. आता माणसं बदलली. आता माझं काम संपलं, इतरांचं राज्य आलं. पण मी कधी तरी तुमची भरपाई करीन.''

''मी सारं विसरुन गेले.'' आई म्हणाली ''तुम्ही आलात यातच मला सगळं मिळालं. पण असं बघा, माझ्याबरोबर माझा पोरगा होता. मी काय, आज आहे, उद्या नाही. पण अजून त्याच्यापुढे त्याचं सारं आयुष्य आहे. तो आयुष्यभर ती डागणी घेऊन राहील की नाही? जाऊ द्या, झालं ते होऊन गेलं. ते काय आता परत येणार आहे? मात्र तुम्ही मोठ्या मनानं आलात, हे मात्र उपकार आहेत.''

तोच बाहेरुन नाईक बाईने हाक मारली आणि नाईक काकू खालच्या मानेने निघून गेली. मग आई पाय सोडून जाजमावर ऐसपैस बसली व राजूला म्हणाली, ''अरे, येणाऱ्या बायका बहुतेक येऊन गेल्या, हळदीकुंकू संपलं. आता उरलेलं पन्हं खपवून टाक.''

पिंपात पन्हे खाली जात होते तेव्हा राजू सारा वेळ निराशेने पाहत होता. पण आईचे ते शब्द ऐकताच त्याने उडी मारली. मग जणू शिकार करुन तिच्यावर तुटून पडल्याप्रमाणे तासभर पोरे पिंपा-भोवती गोंधळ घालत होती.

त्याला एक वर्ष होऊन गेले आणि पुन्हा चैत्र आला. एका मंगळवारी अगदी कच्च्या सकाळीच टांगा दारात उभा राहिला आणि नाईक काकू त्यातून सावकाश उतरु लागल्या. आई माजघरात होती. नाईक काकूला पाहून तिने राजूला पुढे ढकलले, व त्याला हलक्या आवाजात सांगितले, ''बाहेर जा आणि मी न्हाणीघरात आहे म्हणून सांग. आणि जाताना त्यांना कोनाड्यातला करंडा दे.'' मग ती झटकन मधल्या खोलीत गेली आणि मोठ्या कपाटाच्या आड उभी राहिली.

नाईक काकू सावकाश आत आली व राजूला म्हणाली, ''आई आहे ना रे तुझी घरात?''

''अहो, पण न्हाणीघरात आहे.''

''राजू कोण आलं आहे रे?'' आईने आतूनच विचारले.

''मी नाईक काकू'' नाईक काकू म्हणाली, ''मी तुमच्याकडेच आले प्रथम. आज हळदीकुंकू आहे आमच्यात. रखमा येईलच सांगायला. पण तुम्हांला सांगायला मीच आले स्वत: मागचं सारं विसरुन न चुकता यायचं, बरं का?''

''होय, येईन की. थांबता का जरा? आलेच मी दहा-पंधरा मिनिटांत.'' आईने म्हटले.

''नको नको, होऊ द्या सावकाश तुमचं. अजून मलाही जायचं आहे चार ठिकाणी.'' नाईक काकू घाईने म्हणाली. ती जायला निघाली तेव्हा राजूने तिला देवाच्या कोनाड्यातील करंडा दिला. तेव्हा कुंकू लावून घेत नाईक काकू कौतुकाने हसली व त्याला म्हणाली, ''तू देखील यायला पाहिजेस. तुला माझं स्वतंत्र आमंत्रण आहे.''

ती जाऊन टांग्यात बसली व जाताना त्याच्याकडे पाहून पुन्हा हसली.

मग आई हळूच माजघरात आली आणि देवाच्या कोनाड्या-पाशी थांबली. राजू तिच्याकडे पाहतच राहिला.

''आज ना उद्या, तिला आपोआप कळणारच. बिचारी आमच्याच घरी प्रथम आली होती. मी पुढं होऊन तिला अपशकुन कशाला करु?'' ती कातर आवाजात म्हणाली, ''हे बघ, राजू, एक यापुढे ध्यानात ठेव, चिखलातून जायची पाळी आलीच, तर घट्ट मनानं कोरड्या डोळ्यांनी चालत जा. मात्र आपला चिखल इतरांवर उडणार नाही हे बघत जा.'' पण त्यावर ती एकदम गप्प झाली.

राजू एकदम गोंधळला. त्याने म्हटले, ''म्हणजे दादा वारले, हे आम्ही होऊन नाईक काकूला सांगायचं नव्हतं होय?''

त्यावर त्याला डोळे कोरडे ठेव म्हणून सांगणाऱ्या आईला स्वत:च्या डोळ्यांतले पाणी मात्र आवरले नाही.

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :

https://youtu.be/_iYhq18idbQ

* * *

# ''मी पण ज्यांचे गळले हो...''

– शरच्चंद्र बेलवलकर

प्रत्येक मासिकाला, पाक्षिकाला 'संपादकीय' म्हणे असावं लागतं! तीच गोष्ट वर्तमानपत्राची! दररोज अग्रलेख हवाच! आता कुठलीही गोष्ट रूढी, परंपरा किंवा प्रथा या चक्रात सापडली की ती प्राप्त कर्तव्य बनते आणि कर्तव्य म्हणजे आपली आवड-नावडच काय पण निवडदेखील बाजूला ठेवून करायची गोष्ट. साहजिकच असं लिखाण केलं तर त्यात जिवंतपणाही नसेल, ना कुणाला काही रंगत दिसेल.

आपले रविंद्र पिंगे म्हणतात, 'कोऱ्या कागदांची हाक येते आणि मग हाती लेखणी घेऊन त्या हाकेला प्रतिसाद द्यावा लागतो.' पिंग्यांचं म्हणणं अगदी खरं आहे. पण तिथे तीन प्रश्न मनात उभे राहतात. ही कागदांची हाक कुणाला येते? कधी येते? आणि का येते?

मला वाटतं, समोर काही दिसतं किंवा काही घडतं की जे डोळ्यात साठवूनही उरतं, कानांनी ऐकूनही तिथेच गुंजत रहातं खूप खोलवर जाऊन रुतून बसतं आणि मन व बुद्धीला अस्वस्थ करून टाकतं. प्रतिभेला डिवचून जातं. अन् प्रतिभा जेव्हा जागी होते तिला प्रगट व्हायला कागदांची गरज असते. म्हणून ती हाक घालते अन् कागद प्रतिसाद देऊ लागतात. तो प्रतिसादच हाकेसारखा वाटू लागतो.

खरं तर प्रत्येकाच्या सभोवती सततच काही ना काही घडतच असतं. मनाला अस्वस्थ करीतच असतं. प्रश्न असतो प्रतिभेचा. जोपर्यंत तिला धक्का बसत नाही, तोवर काहीच घडत नाही. प्रतिभेला धक्का बसण्यासाठी मनाजवळ एक तरलता लागते, कसोशीनं सांभाळावी लागते.

पहाण्याचं काम करणारे डोळे पुष्कळ, निरीक्षण करणारे डोळे मात्र विरळच. काम करणारे हात पुष्कळ पण कामाशी एकरूप होणारे-कामावर जीव जडणारे हात क्वचितच. जीवन जगावेच लागते म्हणून जगणारे असंख्य, पण जीवनाचा अर्थ शोधणारा एखादाच. असा हा निरीक्षक डोळ्यांचा, कामाशी एकरूप होणारा, जीवनाचा अर्थ शोधणारा माणूस मग कलावंत ठरतो, लेखक बनतो, कवि बनतो, साहित्यिक मानला जातो. संत ही होऊन जातो.

तुम्हा आम्हाला या सर्वांचे कौतुक असणं अगदी स्वाभाविक. ही माणसं विलक्षण कामसू हात आणि आगळंच प्रेमभरलं, करूणामय मन घेऊन जन्माला आलेली असतात. साहित्यिक या जातीतच जन्म घेतात. त्यांचं लिखाण हे 'मला लिहायलाच हवं' या पोटतिडीकीतून जन्माला येतं.

आम्हालाही जे दोन शब्द लिहावे वाटतात ते मराठी भाषेवरील प्रेमातून, आमच्या वाचकांवरील स्नेहातून आणि मराठी संत-साहित्यिकांबद्दलच्या आदरातून स्फुरलेले असतात. या दोन शब्दांच्या निमित्तानं वाचकांशी संवाद घडतो. साहित्य कलाकृतींचं वाचन होतं, जुन्या आनंदस्मृतींना उजाळा भेटतो. कधी कधी तर नवा जीवनार्थ कळून जातो. मग मासिकाच्या संपादनाचे काम म्हणजे एक आनंदयात्रा बनते आणि आनंद वाटल्याविना वाढत नाही म्हणून कोरे कागद समोर घेतले जातात.

निसर्गामध्ये पानापानातून, फुलाफळातून मनोहारी रंगाची उधळण असते. पक्ष्यापक्ष्यांच्या अंगावरील अनेक रंगांनी विणलेली मखमल थक्कच करून टाकते. एकाच फुलात किंवा पक्ष्याच्या अंगावर इतके विविध रंग एकमेकांशेजारी शोभत असतात की ज्यांनी चित्रकलेतले सौंदर्यशास्त्राचे सारे मानवी अंदाज धुळीला पोचवलेले असतात. तरी प्रत्येक फूल, प्रत्येक पक्षी सौंदर्यानं ओथंबलेलाच दिसतो. ऐन उन्हाळ्यात हिरवा रंग डोळ्यांना शीतल वाटतो तर लाल रंग डोळ्यांना भगभगीत वाटतो. पण रस्त्यावरचे, दोन्ही बाजूला ऐन उन्हाळ्यात फुललेले गुलमोहोर लालभडक असतात, हिरवी पानं उरलेलीच नसतात तरी मनाला प्रसन्नच करून जातात. हे कोडं मला तरी अद्याप सुटलं नाही.

ही रंगाची किमया जशी निसर्गाला साधते तशी शब्दांची किमया ज्यांना साधते ते साहित्यिक म्हणून वंद्य होतात. या साहित्यिकाच्या शब्दाशब्दातून, भाव प्रकटतात, रंग उमटतात, नवरस ओथंबतात. मराठी भाषेचं आकाश विविध रंगांनी बहरून उठतं.

या सरस्वतीपुत्रांनी आम्हाला निसर्गाकडे पहाण्याची दृष्टी दिली. जीवनपटाचे रंग उलगडून दाखवले. मराठीचा पाया ज्यांनी रचला ते ज्ञानोबाराया ठामपणे म्हणतात, 'अमृतानेहि पैजा जिंके'' निसर्गाच्या सौंदर्याची वर्णनं, त्यातील गूढांची उकल हा माऊलींच्या प्रतिभेचा सहजभाव आहे. एकेका ओवीवर पानंच्या पानं लिहावीत अशी समर्थ भाषा.

तुकोबांनी तर शब्दांना धन मानलं आणि स्वत: नवकोट नारायण ठरले.

*आम्हा घरी धन । शब्दांचीच रत्ने ।*
*शब्दांचीच वस्त्रे । यत्न करू ।।१।।*

*शब्दचि आमुच्या । जीवाचे जीवन ।*
*शब्दे वाटू धन । जनलोका ।।२।।*
*तुका म्हणे पाहा । शब्दचि हा देव ।*
*शब्देचि गौरव । पूजा करू ।।३।।*

शब्दाला देव मानला तर साहित्याला परमेशच म्हणावं लागेल आत्मविश्वासाची ही अस्सल मराठी परंपरा कधीच खंडित नाही झाली.

*आम्ही असू लाडके देवाचे*
*दिधले असे जगत हे आम्हास खेळावया*

हे केशवसुतांचे उद्‌गार त्याच विश्वासाची परंपरा.

मराठी खरोखर अशी भाषा आहे की तिला प्रतिभावंत साहित्यिकांची उणीव कधी पडलीच नाही. त्यांची नावं जरी सांगायला सुरूवात केली तरी या अंकाची पानंच पुरणार नाहीत. मग हे संपादकीय संपायचं तरी कसं. अजून जे मनात उचंबळून येतय ते लिहिल्याखेरीज तरी समाधान नाही लाभणारं.

एकदा हिमालयात 'मनाली'कडे निघालेलो. वाटेवर एक छोट्या गावात रोअरिक हा रशियन चित्रकार काही काळ राहिला होता. त्याच्या घरी त्याच्या चित्राचं प्रदर्शन आहे. चित्रे पाहताना मला प्रश्न पडला हिमालयाच्या शुभ्र हिमानं झाकल्या शिखरांवर याला इतक्या रंगछटा कशा दिसल्या. दुसऱ्या दिवशी सकाळपासून मी पुन: सारी शिखरं न्याहाळू लागलो. ओ ऽ हो. उगवत्या सूर्यानं या शिखरांना नुसती चमक नव्हती दिली, आकाशांत पसरणाऱ्या साऱ्या रंगाचे दान दिले होते. त्या क्षणापासून मला पूर्ण हिमालय यात्रेत हे रंग शोधण्याचा छंद लागला. मग यात्रा म्हणजे रंगपंचमीचा उत्सव बनला.

अशाच कुण्या प्रवासात कधी बालकवी भेटतात व समोर बोट दाखवीत म्हणू लागतात.

*ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन*
*निळासावळा झरा वाहतो बेटाबेटातून*
*चार घरांचे गाव चिमुकले ऐल टेकडीकडे*
*शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गर्दी पुढे.*

*तर कधी महानोर म्हणतात, शब्द ऐकू येतात.*

*आणि या मातीतूनि चैतन्य गावे*
*कोणती पुण्ये अशी येती फळाला*
*जोंधळ्याला चांदणे लगडून जावे ।*

मग प्रवासातलं डोक्यावरचं तळपतं ऊन चांदणं बनतं. प्रवासच कशाला! अगदी परवाचीच गोष्ट. श्री. सु. रा. चुनेकराच्या घरी मी गेलो होतो.

चुनेकर सध्या जी. ए. कुलकर्णींची पत्रे संकलित करण्याच्या उद्योगात गढले आहेत. पत्रे चाळता चाळता एक वाक्य मला धक्का देऊन गेले. जी. ए. च्या घरी कोणी मोठे साहित्यिक नुकतेच भेट देऊन गेलेले होते. ती आठवण मित्राला सांगताना शेवटी जी. ए. लिहितात, 'काही व्यक्तीच अशा असतात की त्या उठून गेल्या तरी त्या जागेवर काहीसा सूर्यप्रकाश सांडलेला दिसतो' किती साधे शब्द अन् केवढा आशय! हा माणूस हजार वर्षांपूर्वी जन्मता, तर एखाद्या रसिक राजाने भर दरबारात या एका वाक्याकरता त्यांच्या हाती शेरभर सोन्याचा तोडा चढविला असता. चुनेकरांचं घर सोडलं तरी मी या शब्दांतच हरवलो होतो.

साहित्यात अनेकदा आपण आपल्याला हरवूनच जातो. असा मी अनेक नाटकातून हरवलो आहे. आत्मचरित्रे वाचताना हरवलो आहे. विनोदी साहित्य वाचताना, खदाखदा हसताना हरवलो आहे. या हरवून जाण्यातला एक फायदा म्हणजे आपले 'मी पण' हरवते. बा. भ. बोरकर म्हणत तसं...

*''मी पण ज्यांचे पक्व फलापरि*
*अलगद् गळले हो ।''*

साऱ्या आयुष्यभर 'मी'पणाचा काटा आपल्याला बुटातून वर आलेल्या खिळ्यासारखा टोचत असतो. सुंदर साहित्य हा 'मी पणा'चा टोचणारा काटा इतक्या अलगदपणे हळुवारपणे काढून टाकते की आपल्याला कळतही नाही. कळते फक्त एकच की आपण या वाचन यात्रेचे सुखी वारकरी बनलो आहोत.

असे हे साहित्य आणि त्यातली ही 'ऐसी अक्षरे' तुमच्या–आमच्या साऱ्यामधला एक सुंदर इंद्रधनूचा पूल होवो.

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :

https://youtu.be/pGtrRW7AmBk

***

# आम्ही कोण ?........

– केशवसुत

आम्ही कोण म्हणूनि काय पुससि ? आम्ही असू लाडके
देवाचे, दिधले असे जग तये आम्हांस खेळावया
विश्वी या प्रतिभाबले विचारितो चोहीकडे लीलया
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !

सारेही बडिवार येथिल पहा ! आम्हांपुढे ते फिके
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया....
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या
फोले पाखडितां तुम्ही, निवडतो ते सत्त्व आम्ही निके !

शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे?
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोण ते?
ते आम्हीच सुधा कृतींमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे
ते आम्हीच शरण्य मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभते !

आम्हांला वगळा .... गतप्रभ झणी होतील तारांगणे
आम्हांला वगळा .... विकेल कवडीमोलावरी हे जिणे !

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :

https://youtu.be/rD2k74GB1Is

**'ऐसी अक्षरे'चा उपक्रम ही साहित्यसेवा आहे. 'ऐसी अक्षरे'चे प्रकाशन हा व्यवसाय नाही. यातून कोणतेही व्यापारी उत्पन्न, नफा आम्ही मिळवत नाही अथवा तसा उद्देशही नाही. मराठी साहित्यावरील प्रेमापोटी आपल्याकडून काहीतरी करता यावे, या आंतरिक ओढीने उत्तम साहित्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा हा एक प्रयत्न. आधुनिक जगात वावरताना मराठी युवक आपल्या मायबोलीपासून दूर जाऊ नये, केवळ नेट सर्फिंग, मेसेजिंग, चॅटिंग यात – मराठीच काय इतर भाषांचंही वाटोळं करणाऱ्या – नव्या टाईमपासमध्ये अडकून पडू नये, मराठी भाषेतील उत्तम साहित्य त्याने आवर्जून वाचावं अशीच आमची या उपक्रमामागची प्रामाणिक भूमिका आहे. 'ऐसी अक्षरे' मध्ये प्रसिद्ध झालेल्या साहित्याच्या स्वामीत्व हक्काचे मानधन आम्ही देतोच. वेळेअभावी अथवा पत्त्याअभावी संपर्क झाला नसल्यास संबंधितांनी कृपया राग मानू नये. कार्यालयाशी आवर्जून संपर्क साधावा आणि संपर्क पत्ता कळवावा. म्हणजे मानधनाचा धनादेश आणि अंक पाठविता येईल. धन्यवाद.**

**– संपादक**

# अनवाणी

**– व्यंकटेश माडगूळकर**

दुपारची वेळ होती. आपल्या खोलीतल्या कॉटवर बसून बेबी खिडकीतून बाहेर पाहात होती.

बंगल्याच्या आवारातली फुलझाडे, फळझाडे शांत उभी होती. बंगल्याच्या पुढे आडवा बसणारा बॉम्बे-पूना रोड बागेला घातलेल्या मेंदीच्या कुंपणाने झाकून टाकला होता. पण भल्यामोठ्या लोखंडी फाटकातून रस्त्याचा थोडा तुकडा दिसत होता. पलीकडच्या कडेला असलेल्या वडाच्या सावलीत नेहमीची ती फळवाली बाई बसली होती. तिचं लालभडक पातळ, तिच्या समोर पाट्यांतून, करंड्यातून असलेली पिवळी, लाल, हिरवी फळे हे सगळे एखाद्या रंगीत चित्रासारखे दिसत होते. काळ्या रंगाचे कुत्रे फळवाल्या बाईशेजारी अंगाचे वेटोळे घालून बसले होते. ते देखील त्या चित्रातून वेगळे काढता येत नव्हते. त्यापलीकडे हिरवळीने भरलेले मैदान होते. मैदानाच्या कडेला राखी रंगाचा टुमदार बंगला होता आणि बंगल्यामागे फिकट हिरवी झाडी होती, उन्हाने झळाळणारे आकाश होते.

हे एवढेच दृश्य बेबी कित्येक दिवस पाहात होती. विशेषत: दुपारी तरी हे एवढेच तिला बघत बसावे लागले. गोष्टींची पुस्तके वाचायचा कंटाळा येई. निरनिराळी मुलांची मासिके तिच्यासाठी दरमहा मागितली जात, त्यातल्या गोष्टी वाचण्याचाही बेबीला कंटाळा येई. वाचण्यापेक्षा चित्रे काढण्यात मजा असते. पण रोज रोज चित्रे काढणेसुद्धा बेबीला कंटाळवाणेच होई आणि मग ती रिकाम्या मनाने खिडकीतून समोर पाहात राही. सगळा बंगला शांत असे. बेबीचे पपा ऑफिसात गेलेले असत. बेबीची तिन्ही धाकटी भावंडे गेलेली असत. बेबीची मावशी आणि बेबीचा काका कॉलेजला गेलेले असत आणि बेबीशी बोलायला, खेळायला कुणीही घरी नसे. मोलकरीण पार मागे नळावर धुणीभांडी करत बसलेली असत. आई आपल्या खोलीत बाळाला झोपवीत किंवा वर्तमानपत्रे वाचीत असे आणि बेबीशी बोलायला रिकामे असे कोणीच नसे. मासिक-पुस्तकांच्या आणि उषा-पांघरूणांच्या पसाऱ्यात गालाला हाताचा मुटका लावून बेबी एकटीच खिडकीतून बघत बसे.

मधल्या हॉलमध्ये असलेल्या रेडिओवर साडेबाराच्या रेकॉर्ड लागल्या होत्या. शांत वातावरणात भावगीताचे सूर फिरत होते. समोरचे बंद फाटक उघडून दुपारच्या डाकेचा पोस्टमन आत आला. आवारातल्या वाळूवर त्याची पावले वाजली. बेबीच्या खिडकीतून पोर्च दिसत नव्हते. 'पोस्टमन अशी हाक तिच्या कानावर आली, पण टपाल फरशीवर पडल्याचा आवाज आला नाही. बेबी वळली. कॉटच्या उशाशी असलेल्या कुबड्या तिने घाईघाईने घेतल्या. जपून ती कॉटखाली उतरली आणि कुबड्यांच्या आधाराने आपले अधू पाय टाकीत टाकीत खोलीच्या दाराशी गेली. बंद दार उघडायलाही तिला उशीर लागला. दारातून बाहेर पडून, हॉल ओलांडून पुढे यायला उशीर लागला. कष्टपूर्वक एवढा प्रवास करुन जेव्हा ती दारात आली तेव्हा तिला दिसले, की हातात टपाल धरुन पोस्टमन अद्याप उभा आहे, फरशीवर टपाल टाकून तो गेलेला नाही.

पायऱ्यांच्या वर उभे राहून तिने हात पुढे केला आणि तिच्या ध्यानात आले, की आजचा पोस्टमन वेगळा आहे. नेहमी येणारा तो दाढीवाला म्हातारा नाही. अगदी कोवळा, मुलासारख्या चेहऱ्याचा हा नवीनच पोस्टमन आहे.

बेबीच्या पायांकडे लक्ष जाताच लहानसा धक्का त्याला बसला. मनात तो हळहळला आणि अगदी आदबीने त्याने टपाल तिच्या हातात दिले. म्हातारा पोस्टमन एखाददुसरा शब्द बोले तसा तो काही बोलला नाही. लगेच तो पाठमोरा झाला. खाली मान घालून फाटकाकडे गेला. बाहेर गेल्यावर त्याने फाटक नीट बंद केले आणि तसाच खाली मान घालून तो समोरच्या बंगल्याकडे गेला.

हातातल्या पत्रांवरुन बेबीने नजर फिरवली परंतु त्याच्यावर कुणाचे नाव आहे हे तिच्या ध्यानात पटकन् आले नाही. तो पोरगेला पोस्टमनच अद्याप तिच्या डोक्यात होता. त्याचा चेहरा आणि त्याचे वय बघून ती थोडी चकित झाली होती. पोस्टमन म्हटला की तो असाअसा असतो अशी तिची समजूत होती, तिला थोडा धक्का बसला होता. आज कुणीतरी वेगळाच माणूस पोस्टमन होऊन पत्रे द्यायला आला, असे तिला वाटले होते.

एवढ्यात आई उठून बाहेर आली आणि म्हणाली, 'बघू ग बेबी टपाल.'

आईच्या हातात टपाल देऊन बेबी मागे फिरली. मोठ्या खुर्चीत बसली आणि म्हणाली, 'अग, पोस्टमन नवीन होता आज!''

यात सांगण्यासारखे विशेष काय आहे हे बेबीच्या आईला कळले नाही. पत्रावरचे पत्ते बघताबघता ती म्हणाली, 'इश्श! यात एवढं आश्चर्य वाटण्यासारखं ग काय आहे? बदलला असेल.'

'अग नाही, किती लहान आणि गोरागोरा आहे तो.'

'म्हणजे, सगळे पोस्टमन म्हातारे आणि काळेच असतात का?'

'नाही, पण मला हा अगदी वेगळाच वाटला.'

'काहीतरीच तुझं बेबी! हे बघ! बालमित्र' आलाय बघ

तुझा.'

बेबीच्या आईने बालमित्राचा अंक बेबीच्या मांडीवर ठेवला. रेडिओ बंद करुन ती पुन्हा आपल्या खोलीकडे गेली.

दुपारच्या वेळी बेबीला नेहमी एकटेएकटे वाटे.

कुणाशी बोलावे. कुणाशी हसावे असा तिला नेहमी प्रश्न पडे, अशा वेळी म्हातारा पोस्टमन येई. तो बापडा नेहमी घाईत असे, तरीपण एखाद्या वेळी खिडकीशी जाऊन तो टपाल देई. कुणीतरी ओळखीचे आले याचे बेबीला आनंद होई. कधी ती विचारी, 'काय हो पोस्टमन आफ्रिकेचं तिकिट आहे का तुमच्याकडे?'

थोडा वेळ थांबून, विचार करुन पोस्टमन विचारी, 'आफ्रिका देशातलं तिकिट म्हणता का?'

'हो हो. आहे का तुमच्याकडे? मला हवंय हो!'

'ताई, आम्ही आलेली पत्रं घेतो आणि ज्यांची त्याला वाटून टाकतो. त्यामुळं त्याच्यावरची तिकिटं काही आम्हाला मिळत नाहीत. तरीपण मी बघतो मास्तरसाहेबांना विचारुन. आफ्रिकेचं तिकिट असलं तर तुम्हाला आणून देईन.

लवकरच पोस्टमन ही गोष्ट विसरुन जाई, बेबी मात्र विसरत नसे. पण मावशी, काका, आई, पपा या सगळ्यांपाशीच तिने ही मागणी केव्हा ना केव्हा केलेली असे. त्यामुळे आफ्रिकेचे तिकिट कुठूनतरी पैदा करुन ते बेबीला मिळे. बेबीच्या या अधूपणाने सगळ्यांची करुणा तिला मिळत असे. तिला खूष ठेवण्याचा प्रयत्न घरातील प्रत्येक माणूस करी, तरीपण दुपारच्या वेळी केवळ बेबीला करमत नाही म्हणून रोजरोज घरी कोण राहणार? ते काही शक्य नव्हते. सकाळी अकरापासून साडेचार-सहापर्यंत बेबीला एकटेच राहावे लागे. अशा वेळी येणारा म्हातारा तिला देवदूतासारखा वाटे. ती त्याची वाट पाही. रोज ना रोज काही टपाल असेच असे नाही. पण दुपारचा पोस्टमन ओळीने चारसहा दिवस आला नाही असेही घडत नसे. पुष्कळशा घाईत असला की पोस्टमन हाक देई आणि हातातले टपाल आत फेकून निघून जाई. सावकाशपणे चालत येऊन बेबी ते गोळा करी. पत्र कुठून आले आहे, कुणाला आले आहे हे पाही. वर्तमानपत्रे, मासिके, निमंत्रणपत्रिका उघडून वाचून पाही. मग ती सगळी पत्रे स्वत:पाशी ठेवून घेई आणि मावशी, काका, पपा परत आले की पोस्टमनच्या ऐटीत डिलिव्हरी करी.

काही वेळा बेबीलासुद्धा पत्रे येत. शाळेतल्या मैत्रिणींची, नातेवाईकांची आणि पपांच्या ओळखीच्या माणसांची पत्रे येत. त्यात तिच्या प्रकृतीविषयी चौकशी असे. काही गमतीदार बातम्या असत. जन्मत: चांगली, पण अलीकडे आजाराने अधू झालेल्या या मुलीला विरंगुळा मिळावा म्हणून सगळे लोक धडपडत. त्यांची पत्रे घेऊन येणाऱ्या पोस्टमनकडे बेबी डोळे लावून बसे. पोस्टमन हा सुद्धा तिचा एक विरंगुळा होता. तिच्या जीवनात त्याला विशेष स्थान होते. आज आलेला नवा पोस्टमन तिला आवडला होता.

यानंतर पुन्हा तिसऱ्या दिवशी 'पोस्टमन' अशी हाक आली. टपाल टाकल्याचा आवाज आला नाही. कष्टपूर्वक चालून बेबी व्हरांड्यात आली. पोस्टमन उभाच होता. बेबीकडे बघून तो लाजरा हसला. बेबीही हसली. त्याने दिलेले टपाल घेऊन तिने विचारले, 'तुम्ही नवे पोस्टमन का?'

'हो.'

'तुम्ही टपाल टाकून जात जा. मला यायला वेळ लागतो.'

पोस्टमनने बेबीच्या पायांकडे बघितले. बराच वेळ तो गप्प राहिला. एवढ्या सुरेख, देखण्या मुलीला देवाने पाय का बरे दिले नसतील, असे त्याला वाटले असावे. तो काही बोलला नाही, पण त्याच्या डोळ्यांतून ती करुणा पाझरली.

शेवटी तो खालच्या व दयेमुळे मऊ झालेल्या आवाजात म्हणाला, 'लागू द्या न ताई! पोस्टमनचं काम ज्याचं-त्याचं टपाल ज्याच्या-त्याच्या हातात देण्याचं आहे, व्हरांड्यात टाकण्याचं नाही.'

तो असे बोलताना बेबीने त्याच्या पायांकडे बघितले. कसे सडसडीत, गोल होते ते! आणि या पोरासारख्या पोस्टमनची पावले तर किती छान होती. एकाएकी बेबीच्या लक्षात आले, की ही चांगली पावले अनवाणीच आहेत. पोस्टमनने पायांत काही घातलेले नाही... का बरे घातले नाही?

पोस्टमन वळला. सुरेख पावले टाकीत निघून गेला. बेबीला वाटले, या माणसाने पायात का काही घातले नाही? रस्त्याने अनवाणीच अशी ही माणसे चालतात तरी कशी? चांगली छान खाकी टोपी डोक्यावर होती. अंगात खाकी कोट होता, खाली अर्धी पँट होती. पोस्टमनचा पोषाख तर नीटनेटका होता. इतके सगळे असून पायांत वहाणा मात्र नव्हत्या! घालून यायला विसरला असेल का? पण विसरला असता तर त्याचे लक्ष सारखे आपल्या पायांकडे गेले असते. दुसऱ्याशी बोलताना त्याच्या ध्यानात आपण अनवाणी आहोत हे आले तर नाही ना, असे सारखे वाटून हा पोस्टमन ओशाळला असता. तसे तर काही दिसले नाही. कदाचित त्याच्या वहाणा तुटल्या असतील, त्या दुरुस्त होऊन यायच्या असतील, मग काय करेल बापडा! काम तर केले पाहिजे. टपाल वाटीत दारोदार हिंडले पाहिजे. असेल, असेच असेल. नाहीतर उगीचच्या उगीच अनवाणी कोण चालेल?

तात्पुरते का होईना, या निर्णयाने बेबीचे समाधान झाले. टपाल घेऊन ती खुर्चीत बसली. पोस्टमनचे अनवाणी पाय हलके हलके तिच्या मनातून गेले.

BELVALKAR HOUSING

बेबीची आणि या लाजाळू पोस्टमनची गट्टी जमलीच नाही. म्हाताऱ्या पोस्टमनपेक्षा तो चांगला होता. किती अदबीने बोले, किती छान हसे, पण बेबीची त्याची घसट अशी झालीच नाही आणि त्यामुळे जरुरीपेक्षा जास्ती बोलणे कधी घडले नाही. बोलणे घडले नाही, तो अनवाणी का असतो हे कोडे सुटले नाही! दर खेपेला बेबीला वाटे, की आज त्याच्या पायांत वहाणा दिसतील. आज त्याने त्या दुरुस्त करून आणल्या असतील. पण पोस्टमन अनवाणीच येई. मग बेबी म्हणे, 'तुटल्या नसतील, त्या कुठेतरी हरवल्या असतील. त्या शोधून सापडत नाहीत अशी खात्री झाली की हा नवीनच वहाणा घेईल.' आणि नवीन वहाणाही कधी पोस्टमनच्या पायांत दिसल्या नाहीत, तो आपला अनवाणीच येई. ओठ न उघडता हसे, खाली बघे, टपाल देताच चालायला लागे. आठवडा गेला, महिना गेला, दोन महिने गेले, परंतु पोस्टमनच्या पायांत वहाणा आल्या नाहीत. त्या का नाहीत हे विचारण्याचा धीर बेबीला झाला नाही.

हिवाळा संपला आणि उन्हाळा आला. सुम्म उन्ह पडू लागले. डांबरी रस्ते तापून डांबर वितळू लागले. रस्त्याची सालडी निघू लागली. अशा उन्हात कुणी कुणाला फाशीसुद्धा देणार नाही, पण दुपारचा पोस्टमन यायचा. त्याच्यापाशी छत्री नसे, सायकल नसे, आणि पायांत वहाणाही नसत. उन्हाने त्याचा गोरामोरा चेहरा तांबडा-लाल झालेला असे. घामाने त्याचा खाकी कोट पाठीला चिकटलेला असे. वाळलेल्या ओठांवरुन जीभ फिरवून तो लाजरे हसू हसायचा आणि टपाल देऊन परत फिरायचा. उन्हात तळत अनवाणी हिंडायचा.

हा पोस्टमन पायांत का घालत नाही? त्याचे पाय भाजत नाहीत का? त्याच्या पायांना घाण लागत नाही का? पायांत काही घातल्याशिवाय त्याला चालवते तरी कसे? ज्या ज्या वेळी बेबी त्या पोस्टमनला पाही त्या त्या वेळेला हे प्रश्न तिच्या मनात उभे राहात. वास्तविक ही किती साधी बाब होती, पण बेबीला त्याचा त्रास होई. तिच्या मनाला ही गोष्ट बारीक सडीसारखी खुपत राही. विचार करकरूनही हे गूढ तिला उलगडत नसे. आणि मग त्या पोस्टमनचा तिला राग येई. चार वर्षांच्या आपल्या भावाला चड्डी-शिवाय घरातून हुंदडताना पाहिला की त्याची जशी तिला चीड येई, सैंपाकात असताना आईच्या अंगावर जे मळके पातळ असे ते पाहून जसा राग येई, रविवारी पप्पांची वाढलेली दाढी बघून तिला जे वाटे, ते या पोस्टमनला अनवाणी पाहून वाटे. त्याचा तिला अगदी राग येई.

या चिडीनेच एकदा ती आईला म्हणाली, 'आई, तो पोस्टमन अनवाणीच का ग हिंडतो? पायात घालायला काय जातं त्याचं?'

बेबीला अशा गोष्टींचा त्रास होतो हे बेबीच्या आईला माहीत होते. चिडचिड्या आवाजात कपाळाला आठ्या घालून तिने जेव्हा हे विचारले तेव्हा आई म्हणाली, 'सुखाने का अनवाणी हिंडत असेल तो, बेबी? पायात घालायला मिळत नसेल त्याला!'

'म्हणजे काय? साधी वहाण नाही?'

बेबीची आई गरिबीतून वर आली होती. साध्यासुध्या वस्तूसुद्धा काही माणसांना कशा मिळत नाहीत, हे तिला ठाऊक होते. लहानपणी आपणही कसे अनवाणी पायाने हिंडत होतो याची तिला आठवण झाली. बेबीच्या या प्रश्नाने तिचे अनुभवाने आलेले शहाणपण डिवचले गेले. ती म्हणाली, 'बेबी, नशिबाने तुम्हाला कधीच कशाची वाण पडली नाही. अमुक वस्तू हवी असे म्हणताच ती तुम्हाला आजवर मिळत आली आहे. त्यामुळे गरीब लोक कसे राहतात, याची तुम्हाला कल्पना नाही.'

'गरीब झाले म्हणून काय वहाणा मिळत नाहीत?'

'नाहीत मिळत. तो बापडा पोस्टमन-महिन्याला पन्नाससाठ रुपये त्याला मिळत असतील. त्यात पोरंबाळं, भाऊबहीण ही सगळी माणसं पोसायची म्हणजे साधी गोष्ट नाही! दर सहा महिन्याला वहाणांसाठी पाच रुपये टाकणं कसं परवडणार त्याला? गरीब बिचारा अनवाणी हिंडतो... काय करणार? गरिबी मोठी कठीण असते, बेबी!'

एवढ्यात बेबीचे पप्पा बाहेरून आले. येताना त्यांनी बेबीसाठी रंगीत चित्रांची पुस्तके आणली होती. पुस्तकातली चित्रे साधीच होती, पण साधा पाण्याचा ब्रश त्यांच्यावरून फिरवला की रंग उमटत, काही जादू होई आणि झाड हिरवे होई. फुले तांबडी होत. पाणी निळे होई.

पायातले बूट टक्टक वाजवीत पपा बेबीच्या खोलीत आले. बेबीच्या गालावर थोपटून म्हणाले,

'काय बेब्या, मजा आहे ना?'

त्यांचा आवाज त्यांच्या देहासारखाच मोठा आणि उंच होता. पुस्तके बेबीच्या हाती देत ते पुन्हा म्हणाले, 'चित्रांची पुस्तकं पाहिजे होतीन् तुम्हाला? ही घ्या.' आणि मग ते कपडे काढण्यासाठी गेले. त्यांच्या मागोमाग आईही गेली. पपांनी काढलेला टाय आणि कोट हँगरला लावीत बेबीची आई म्हणाली,

'कसं व्हायचं या पोरांचं पुढं कोण जाणे!'

'काय व्हायचंय? उपचार चालू आहेत. हळूहळू स्ट्रेंग्थ येईल तिच्या पायात. झकास चालायला लागेल.

'त्याच्याबद्दल नाही म्हणाले मी. जगाची काही कल्पना नाही यांना.'

'करायची आहे काय असून? अहो, पोरंच ती!'

'होय. पण इतरांच्या मुलांना या गोष्टी समजतात. मला आता विचारीत होती, 'तो पोस्टमन अनवाणी का हिंडतो, साध्या

वहाणासुद्धा कशा मिळत नाहीत त्याला?...' काय सांगायचं तिला?'

यावर बेबीचे पपाही थोडा वेळ गप्प राहिले. त्यांनीही कर्तबगारीने सगळे मिळवले होते, वार लावून शिक्षण घेतले होते. सिंदबादच्या मानगुटीवर बसलेल्या म्हाताऱ्याप्रमाणे दारिद्र्य त्यांच्याही मानगुटीवर कित्येक दिवस बसले होते.

त्यांचा आवाज नेहमीपेक्षा वेगळा झाला आणि हनवटी चोळीत ते बायकोला म्हणाले, 'या गोष्टी समजाव्यात असं त्यांच्या बाबतीत काही घडलंच नाही. वस्तू हरवली की ती शोधावी हेसुद्धा त्यांना माहीत नाही, बाजारातून दुसरी आणा असं ती सहज म्हणतात. ही एक चूक आपली आहे, असल्या गोष्टींची जाणीव आपण त्यांना करून दिली पाहिजे.'

बेबीच्या आईला ते म्हणणे पटले. जीवनात पुढे उपयोगी पडतील अशी वळणे आपण आपल्या मुलांना अद्याप लावली नाहीत ही गोष्ट बरी नाही, असे आईला वाटले. ती हुरहूर मनात घेऊनच आई उद्योगाला लागली आणि बेबीचे पपा पण कोचात रेलून गंभीरपणाने दुपारची वर्तमानपत्रे चाळू लागले. त्या दिवसापासून बेबीची आई बेबीला गरीब लोकांचे जीवन कसे कष्टमय असते ते सांगू लागली आणि हलके हलके पोस्टमनविषयीच्या करुणेने लहानग्या बेबीचे मन भरून गेले. त्या बापड्याचे कष्टमय जीवन बघून तिचे मन द्रवू लागले. अरण्यात चुकलेल्या बाळाविषयी परी जशी बाळाला दया दाखवते तशी दया आपण या माणसाविषयी दाखवावी असे वाटू लागले. आपल्याला पाय नाहीत म्हणून नेहमी मनात झुरणारी ती पोर अनवाणी पोस्टमनविषयी विचार करू लागली. तेच दु:ख तिचेही झाले. रोज दुपारी झाली, सूर्य चढला, उन्ह तापू लागले की ती पोस्टमनच्या वाटेकडे डोळे लावून बसू लागली. तो येण्याची टळली, उन्हे उतरली की तिला हायचे वाटे. जणू काही तिचे पत्र नव्हते म्हणजे पोस्टमनला सुट्टीच होती. तो इकडे आला नाही तसा दुसरीकडेही गेला नाही, त्याचे पाय पोळले नाहीत, त्याला उन्ह लागलेच नाही.

'अनवाणी चालले म्हणजे पाय किती पोळतात? फार पोळतात का? डोळ्याला पाणी येते का? कानातून कळा येतात का?' हे प्रश्न बेबीच्या मनात वरचेवर येत. पाय कसे पोळतात हे तिला नक्की माहीत नव्हते. अनवाणी पायाने ती कधी तापल्या रस्त्यांवरून चाललीच नव्हती. मग एकदा लख्ख उन्ह पडले असताना ती उठली आणि आजूबाजूला कोणी नाही असे बघून व्हरांड्यात आली. बंगल्याच्या अंगणात पसरलेली वाळू उन्हाने चमकत होती. बेबीचे डोळे दिपले, काखेत कुबड्या घेऊन, तोल सावरीत ती व्हरांड्यात अगदी कडेला आली. चार पायऱ्या उतरल्या होत्या. बेबीच्या छातीत धडधड सुरू झाली. 'हे जमेल का? पाय दुखतील का?' तिचा श्वास जोराने होऊ लागला. तो आवरता आवरेना. पण तिने निश्चय केला. खालच्या ओठावर दात रुतवले. श्वास रोधला आणि हळूच उजवी कुबडी काढून पायरीवर ठेवली. त्या मागोमाग सावकाश अधू पाय ठेवला आणि मग धडपडत, पुढेमागे होत एका झटक्यात चारी पायऱ्या उतरून ती खाली आली. ही सगळी क्रिया आपोआप घडली. उलटीसुलटी वाहने धावताहेत असा रस्ता, एखाद्या लहान मुलाने मिटल्या डोळ्यांनी धूम ठोकून पार करावा तशी ती पायऱ्या उतरून खाली आली. तिचे पाय गुडघ्यांत दुखले. डाव्या पायाचा अंगठा मुरगळला. वेदना सोशीत खालच्या पायरीवर बेबी डोळे मिटून उभी राहिली. तिचे पाय थरथर कापत होते. शरीराची आणि मनाची सगळी क्षुब्धता निवल्यावर पोर्चच्या सावलीतून बेबी पुढे झाली आणि गरम तापलेल्या वाळूवर तिने पाय ठेवले. क्षणार्धात ती वेदना तिच्या तळव्यातून शिरून केसांपर्यंत आली. 'आई ग' अशी किंचाळी तिच्या तोंडातून बाहेर पडली आणि त्याचबरोबर तळवू उचलून टाचेवर उभे राहण्याच्या धडपडीत तोल जाऊन बेबी धाडकन् खाली कोसळली!

आई धावत आतून आली. घाबरल्या आवाजात, 'बेबी, बेबी, माझ्या राजा! असे ओरडत आईने तिला उचलले. मोलकरणीला हाक मारली. आईने आणि मोलकरणीने उचलून तिला आणले, कॉटवर ठेवले. बेबीला कुरवाळीत, गोंजारीत आईने विचारले, 'बाई, काय झालं ग, कशी पडलीस?' तेव्हा मिटले डोळे उघडून बेबीने स्मित केले. ती म्हणाली, 'काही नाही ग माझे पाय पोळले.

बेबीने मनाशी निश्चय केला, की यापुढे त्या गरीब पोस्टमनला अनवाणी चालू द्यायचे नाही, त्याच्या पायात वहाणा घालायच्या. पपांना सांगून त्याला पाच रुपये द्यायचे. पण रुपये हातात आल्यावर तो वहाणा घेईल का? का आपल्या मुलाबाळांसाठी, आईवडिलां-साठी तो हे पैसे खर्च करील आणि पुन्हा अनवाणीच चालेल? त्यापेक्षा पपांना सांगून त्याला वहाणाच द्याव्यात! पण पपांना सांगितल्यावर त्यात आपले काय राहिले? तो काही आपला स्वत:चा परोपकार होणार नाही. हे आपण स्वत: केले पाहिजे. आपण आपल्याजवळच्या पैशातून वहाणा घेऊन त्याला दिल्या पाहिजेत. वेळोवेळी पपांनी दिलेले पैसे आपल्यापाशी आहेत. थोडे थांबले तर ते पाच रुपये होतील... असेच करावे. बापड्या पोस्टमनला आपण स्वत: वहाणा द्याव्यात.

हा विचार पक्का झाला आणि बेबीला विलक्षण समाधान झाले. आपण काहीतरी फार मोठी गोष्ट करतो आहोत या जाणिवेने ती आनंदून गेली.

नेहमी येणारा चांभार जेव्हा घरी आला तेव्हा बेबीने त्याला जवळ बोलावून घेतले आणि पाच रुपये त्याला देऊन खाजगी

BELVALKAR HOUSING

आवाजात सांगितले, 'हरिबा, मला याच्या वहाणा आणून दे.'

हरिबाने बेबीच्या अधू पायांकडे पाहिले आणि मान हालवून म्हटले, 'देतो की ताई. माप घेतो.'

'अरे माझ्या पायाला नाहीत.'

'मग?'

'दुसऱ्यासाठी पाहिजेत. तू आणून दे म्हणजे झालं.'

हरिबा गोंधळून गेला. 'पण ताई, कुणासाठी?'

'ते नाही मी सांगणार!'

'नका सांगू, पण माप कुणाचं घेऊ मी?'

'मापाशिवाय नाही का बांधता येणार तुला वहाणा?'

'येतील, पण त्या बरोबर कशा बसतील पायाला?'

याचा काही बेबीने विचार केला नव्हता! ती मोठ्या गोंधळात पडली. आपला सगळाच बेत फिसकटणार असे तिला वाटू लागले. पोस्टमनला एकदम वहाणा देऊन चकित करण्याचा तिचा इरादा कोसळणार म्हणून तिला वाईट वाटले. काय बरे करावे? नकळत पोस्टमनच्या पायाचे माप कसे घ्यावे? तिने विचार कर कर केला आणि शेवटी ताटकळून बसलेल्या चांभाराला सांगितले, 'तू दोन दिवसांनी ये, हरिबा. मग मी माप देईन.'

दुसऱ्या दिवशी पोस्टमन आला. 'बेबीसाहेब' अशी हाक त्याने मारली. बेबी येईपर्यंत तो पोर्चमध्ये उभा राहिला. या अधू मुलीविषयी सगळ्यांना वाटे ती हळहळ त्यालाही वाटत होती. त्या हळहळीमुळेच फारसा न बोलणारा बुजरा असा पोस्टमन बेबीशी विशेष अदबीने वागत होता. थोडा वेळ पत्रे हातात घेऊन तो उभा राहिला. बेबी उशिरा आली. ती येताच त्याने स्मित केले आणि टपाल देऊन तो निघून गेला.

ते टपाल खुर्चीवर टाकून बेबी व्हरांड्याच्या कडेशी आली. तिला पायऱ्या उतरायच्या होत्या. भीतीची कळ तिच्या छातीतून उठली, पाय कापू लागले, श्वास जोराने होऊ लागला. पण तिला पायऱ्या उतरायच्या होत्या. काहीही झाले तरी ते तिला करायचेच होते. डोळे मिटून तिने धीर गोळा केला. मनोमन प्रार्थना केली, 'देवा, मला पाडू नकोस. मी पडले की आई धावून येईल आणि माझं काम काय होणार नाही. मला पाडू नकोस!' आणि मग डगमगत्या शरीराने ती पायऱ्या उतरली. तीच धडपड, तीच कळ. पण देवाने प्रार्थना ऐकली. बेबी पडली नाही. रक्त उसळून आले, कानशिले तापली आणि पायऱ्या पार करून ती खाली आली.

जितके कष्ट पायऱ्या उतरायला झाले तितकेच खाली बसायला झाले. तसेच शरीर हेंदकाळले. डोक्यात काही हलले. पण कष्टपूर्वक बेबी खाली बसली. फ्रॉकच्या पुढच्या खिशातून तिने कंपासपट्टी काढली आणि नुकत्याच गेलेल्या पोस्टमनच्या पावलांची मापे घेतली - आडवी, उभी, तिरकी. ती मापे, तो आकार डोक्यात नीट नोंदवला आणि मग पुन्हा तेच सगळे कष्ट घेऊन बेबी परत आपल्या खोलीत आली. कॉटवर बसून तिने काही वेळ विश्रांती घेतली. चित्रकलेचे ज्ञान आता पणाला लागले होते. कागद, पेन्सिल घेऊन बेबी आकृती जमवू लागली. पांढऱ्या शुभ्र कागदावर तिने रांगोळीसारखे ठिपके मांडून घेतले आणि सावकाश, काळजीपूर्वक ती पायाचा तळवा काढू लागली. हळूहळू कागदावर तळव्याचा आकार उमटू लागला.

हरिबा चांभाराला माप मिळाले. त्या हिशोबाने त्याने वहाणा बांधून आणून बेबीपाशी दिल्या. शिमगा होऊन गेला आणि पोस्त मागण्यासाठी दुपारचा पोस्टमन कधी येतो याची बेबी वाट पाहू लागली. इतके दिवस झाले, पण बेबीला त्या पोस्टमनचे नाव काही ठाऊक नव्हते. पोस्टमनला नाव तरी असते का? सकाळचा पोस्टमन, दुपारचा पोस्टमन, तारेचा पोस्टमन याशिवाय त्याला काही वेगळे असे नाव असले पाहिजे, बेबीने ते विचारायचे ठरवले.

मग एकदा तो दुपारचा आला आणि बेबी येण्याची वाट बघू लागला. पाय ओढीत ओढीत बेबी आली. तिच्या हातात वर्तमानपत्रात गुंडाळलेले काहीतरी होते. व्हरांड्यावर येऊन ती उभी राहिली. नेहमीप्रमाणे ओठ न उघडता पोस्टमन हसला. पत्रांची जुडी त्याने बेबीच्या हातात दिली. बेबीने विचारले, 'का हो पोस्टमन, तुमचं नाव काय?''

'हरि - हरि पांडुरंग कुलकर्णी...का हो?'

'कुलकर्णी?' बेबीला आश्चर्य वाटले. कुलकर्णी आडनावाचा माणूस कधी पोस्टमन असतो हे तिला ठाऊक नव्हते.

मग पोस्टमन जाण्यासाठी वळू लागला. घाईघाईने बेबी म्हणाली, 'अहो, तुम्ही शिमग्याचं पोस्त नाही मागितलं?'

पोस्टमन म्हणाला, 'मागीन नं ताई, साहेबांची आणि माझी कधी गाठच पडत नाही!'

'मी दिलं तर चालेल का?'

तुम्ही कशाला? साहेबांच्याकडून घेईन मी.'

'पण मलाच द्यायचं असलं तर?'

आणि मग बेबीने वहाणांचे बंडल हरि पोस्टमनच्या हाती दिले. गोंधळून, आश्चर्यचकित होऊन त्याने ते उघडले. आत सुरेख वहाणा होत्या, नव्या चामड्याचा वास भपकारत होता.

'हे काय?'

'तुम्हाला वहाणा!' सालस शेतकऱ्याच्या मुलीला परीने सोने-माती द्यावेत आणि ते देताना हास्य करावे तसे प्रसन्न हसून बेबीने हरीकडे बघितले, 'मी पुष्कळ दिवसांपासून बघतेय, तुम्ही अनवाणी येता. तुम्हाला कमी पगार असेल, तेवढ्यात तुमचं भागत नसेल. मनात असूनही तुम्हाला वहाणा घेणं जमत नसेल, म्हणून मी माझ्या स्वत:च्या पैशातून या आणल्या!'

पोस्टमनला काय बोलावे हे कळेना! वहाणा घेणे ही गोष्ट फार लांबली होती हे खरेच होते. प्रपंचाच्या झंगटातून हे राहिले होते. आज-उद्या करता करता बरेच दिवस अनवाणी हिंडणे झाले होते. सरपण किंवा पीठ नसले म्हणजे जसे अडते तसे काही वहाणांनी अडत नाही, नाही का?

बेबी म्हणाली, 'बघा तुमच्या पायाला होतात का!'

पोस्टमनने काचेची वस्तू खाली ठेवावी तशा वहाणा खाली ठेवल्या. 'बेबीताई, तुम्ही माप कसं मिळवलं?'

'इथं वाळूवर तुमची पावलं उठतात. त्यांच्यावरून मी पट्टीनं लांबीरुंदी मोजली, कागदावर तळवा काढला आणि तो आमच्या चांभाराकडे दिला.'

मग तर पोस्टमनला काय बोलावे हे मुळीच कळेना. असे कधी यापूर्वी त्याच्या बाबतीत घडले नव्हते. वहाणांकडे बघत तो कितीतरी वेळ गप्प उभा राहिला. त्याचे अंत:करण जड झाले होते. वरचेवर तो घुटके घेत होता.

बेबी म्हणाली, 'घाला की पायात.'

पोस्टमनने बेबीच्या पायांकडे पाहिले. अपराधी होऊन वहाणा पायात घातल्या. सलाम करून तो घाईने फाटकाबाहेर पडला.

खाली मान घालून हरि गेटाबाहेर पडला. कुबड्याच्या आधाराने अजून बेबी उभी होती. पायांत वहाणा घातलेला पोस्टमन कसा चालतो ते ती बघत होती.

पोस्टमन मनात म्हणत होता, 'या लेकरानं मला अनवाण्याला वहाणा दिल्या, त्याला पाय नाहीत ते कसे देणार मी? मनाला कितीती वाटलं तरी तिच्यापाशी नाही ते कुणी तिला देऊ शकत नाही.

बटवडा आटपून हरि पांडुरंग पोस्टात गेला. मोठ्या साहेबांच्या टेबलासमोर जाऊन म्हणाला, 'साहेब, माझी लाइन बदला, सिटीत घाला कुठंही.'

'किर्लोस्कर कथा भाग २' मधून साभार.

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :

https://youtu.be/M0pjsvChvQs

***


Sarita Vaibhav
BUILDING B9 & B10
पु. ल. देशपांडे उद्यानासमोर, सिंहगड रोड,

प्रीमियम 2 व 3 BHK
फक्त 1.01 कोटींपासून* (सर्वखर्चसमाविष्ट)




आपल्या माणसांनी प्रत्येक घर शुभंकर करणारे बेलवलकर डेव्हलपर्स सादर करीत आहे, पुण्यातल्या मोक्याच्या ठिकाणी सिंहगड रोडवरील पु. ल. देशपांडे उद्यानासमोरचा, 300+ परिवार नांदत असलेल्या 'सरिता वैभव'चा शेवटचा फेज. जिथे फुलते आहे, खऱ्या वैभवाने झळाळणारी आनंदी, समाधानी सुखसंपन्न जीवनशैली!

**शेवटचे काहीच फ्लॅटस् शिल्लक. आजच संपर्क साधा.**

सरिता वैभवची वैशिष्ट्ये:

- पुण्यातील मध्यवर्ती ठिकाण
- जागेचा पुरेपूर वापर
- निसर्गाच्या सानिध्यातील प्रकल्प
- पझल पार्किंग
- 300+ आनंदी परिवारांचा शेजार
- 24 x 7 सुरक्षितता

BELVALKAR HOUSING
प्रत्येक घर शुभंकर
बी 9 आणि 10, सरिता वैभव, पु. ल. देशपांडे उद्यानासमोर, सिंहगड रोड, पुणे - 411 030
www.belvalkarhousing.com

**संपर्क - 90110 10811**

MahaRERA No.: "B9 & B10"-P52100016093. Available at website: https://maharera.mahaonline.gov.in

# कुस्करूं नका ही सुमनें !

– भास्कर रामचंद्र तांबे

जरि वास नसे तिळ यांस तरी तुम्हांस अर्पिली सु–मनें.
मधु नसे तिळभरी अंतरी तरी करीं हीं धरणें.
यां वर्ण नसे सौवर्ण; जों न हीं शीर्ण तोंवरी धरणें
घ्या करीं, क्षणाभीतरी वाळतिल तरी तयांना जपणें.
हीं वन्य फुलें मधुशून्य, मानितिल धन्य तुम्हांकरिं सजणें.
घरिं मुलें तशीं हीं फुलें, हूड वत्सलें लोचनें बघणें.
अंगुली कठिण लागली तरी संपली ! हळुच या शिवणें.
हृद्वनीं फुले कोठुनी जशीं उपवनीं उमलतीं नयनें?
मालती, बकुल, जुइ जाति हीं जरी हातिं, हीं हि असुं देणें.
अंजली धरुनि अर्पिलीं, भक्तिनें दिलीं म्हणुनि तरि घेणें!

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :

https://youtu.be/c6ACKke0C_4

# सय पावसाची
# लय पावसाची

– शरच्चंद्र बेलवलकर

घरघरती, गडगडती
मेघांचे हे थवे धिटुकले
धाकच दाखविती

चकचकती, चमचमती
पहा विजांचे तेज पसरले
आभाळावरती

गरगरती, भिरभिरती
वाऱ्याचेही झोत फडकती
सर्वांगा झोंबती

टपटपती, तडतडती
थेंबाचे जे नर्तन चाले
पाचोळ्या वरती

झरझरती, सरसरती
पागोळ्यांचे थेंब चिमुकले
मोती ओघळती

लवलवती, लसलसती
कोभांचे ते रूप देखणे
मृदु मातीवरती

खळखळती, सळसळती
नदी नाल्यांना रूप सर्पिले
मनी दाटे भिती

झुरझुरती, हुरहुरती
त्या भावांनी जन्म घेतले
कवितेच्या पोटी

***

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :

https://youtu.be/BkJhQSfZ68M

# सासू माझी भली

**– भा. ल. महाबळ**

सासूबाईंना काय वाटतं, हे मला माहीत आहे! मी लग्न होऊन घरात आले आणि सगळ्या गोष्टी मला आयत्या मिळाल्या, हे सासूबाईंना खटकत आहे.

माझा नवरा आनंद आपल्या आईला 'आई' म्हणतो. बरं करतो. तो मला म्हणाला,

'नीता, तूही आईच म्हण!'

खरं तर, मी काकू म्हणणार होते. कारण माझ्या आईला मी आई म्हणते! तेव्हा दोन दोन आयांचा गोंधळ कशाला, असं मनात आलं. पण प्रथम आनंदाचा विचार केला आणि मग दुसरा विचार केला, आपली आई आपल्या घरी असणार. सासूबाईंची आणि आपल्या आईची अशी गाठभेट किती वेळा होणार, त्या प्रत्येक भेटीच्या वेळी आपण साक्षीदार थोडेच असणार; आणि समजा, असलो, आणि दोघींना एकाच वेळी हाक मारायची जरूर पडली, तर आपल्या आईला नीताची आई व सासूबाईंना आनंदची आई म्हणून हाक मारता येईलच की.

सासूबाईंना मी आईच म्हणते. केवळ आनंदाला बरं वाटावं, म्हणून.

पण आई म्हटलं, म्हणून सासूबाईंची आई थोडीच होते? कोरांटीला जाई म्हणाल, हो, पण काट्यांचं काय कराल? कोरांटीचे काटे कुठं जातील?...

'सासूबाई, त्या सासूबाई; आणि आई, ती आईच.'

असं मी मनात म्हणाले आणि मनातच चपापले!

का, म्हणून विचारा?

मी एकदा आनंदाला 'माझी आई किती चांगली आहे, प्रेमळ आहे, ती आमच्या घराकरता कशी राबते, तिला विणता येतं, भरता येतं, तिला चित्रं काढता येतात आणि वेळात वेळ काढून आणि दुपारची झोप टाळून ती हे सारं करते. मुख्य म्हणजे, तिच्याकडे जीवनाकडे पाहण्याची स्वच्छ, सरळ व आस्वादक दृष्टी आहे. तिला वावगं, खोटं आवडत नाही, विषयांतर खपत नाही आणि तर्क सोडून ती बोलत नाही. तोंडापुरतं तर ती बोलणारच नाही.' वगैरे वगैरे वर्णन करुन-करुन सांगत होते!

माझी ही टकळी चालू असतानाच माझ्या ध्यानी आलं होतं, की मुलीचं लग्न झालं आणि ती सासरी आली, की तिला शंभर वेळा आई आठवते आणि आईची प्रशंसा करण्यासाठी तिच्या जिभेला दुसरी एक जास्तीची जीभ फुटते!

आता माझ्या आईविषयी हे सारं सांगताना खरोखरच आनंदाच्या आईविषयी म्हणजे सासूबाईंच्याविषयी काही म्हणजे, काही माझ्या मनात नव्हतं, काहीही बोलायचं पण नव्हतं.

बोलण्यासारखं काही असेल, तर बोलायचं ना!

माझ्या आईच्या अंगात खंडीभर गुण आहेत; आणि सासूबाईंच्या अंगात गुंजभर गुण नाही, ही वस्तुस्थिती आहे.

आनंद हा सासूबाईंचा मुलगा आहे, हाच काय तो त्यांचा एक मोठा गुण.

आणि आनंदाच्या अंगातील गुणही त्यांच्यापासून आलेले नाहीत.

हां! आपल्या माहेरचा जास्ती आणि फाजील गर्व मात्र सासूबाईंच्या ढोलम् ढोल शरीरात पुरेपूर भरला आहे. माहेरविषयी अभिमान असावा. नको कोण म्हणतं आहे? पण किती आणि कसा असावा?

मला आहे तसा आणि तेवढाच!

–आणि माहेरविषयी गर्व नसावा. किती आणि कसा नसावा?

आमच्या सासूबाईंना आहे, तेवढा नसावा.

यातून तुम्हांला काही कळलं नसणार. कसं कळणार?

काही गोष्टी अशा बरोबर थोड्याच समजावून, मोजून, मापून सांगता येतात?

माहेराविषयीचा माझा सार्थ अभिमान व सासूबाईंचा त्यांच्या माहेरविषयीचा दुरभिमान कसा आहे? हा! राम-रावण युद्धाप्रमाणे! म्हणजे रामाचं आणि रावणाचं घनघोर युद्ध कसं झालं? तर राम-रावण यांच्या युद्धाप्रमाणं. त्या युद्धाला कशाची उपमा द्याल?

माहेरविषयीच्या सार्थ अभिमानाला उपमा माझ्याच अभिमानाची; व सासू-बाईंच्या दुरभिमानाला दाखला त्यांच्या दुरभिमानाचा.

सांगायचा मुद्दा मागंच पडला.

मी माझ्या आईविषयी असं भरभरून बोलत होते आणि आनंदाच्या चेहऱ्यावर दुःखाची अभ्रं दाटून आली होती!

–आणि एकदम आनंदातील नवऱ्यानं गुर्रर्र केलं,

'नीता, हे बघ! माझ्या आईच्या अंगात यांतला एकही गुण नसो, पण ती माझी आई आहे! ती केक करत नाही, वड्या करत नाही, चारचौघांत मिसळत नाही... मला मान्य आहे ते! तिच्या नटण्या-मुरडण्यावरुन बाबा सुद्धा तिच्यावर चिडत असतात; पण माझी आई, ती माझी आई. आणि तुझी आई ही, काही झालं, तरी माझी सासूबाईच!'

आनंदाचा मुद्दा ताडकन माझ्या मर्माला जाऊन भिडला. त्याचं म्हणणं बरोबर होतं! आई, ती आई; आणि सासूबाई, त्या सासूबाई!

आणि ठरवून टाकलं, की आपल्या आईच्या स्तुतीचा एक शब्द म्हणून वाचेवाटे काढावयाचा नाही.

आमच्या सासरच्या आई– म्हणजे, सासूबाई या मुळात अशा परमेश्वराकडे निर्गुण आहेत, निराकार आहेत, असं म्हणायला माझ्या डोळ्यांना चश्मा थोडाच लागला आहे? आकारानं त्या भरभक्कम आहेत! त्यांना आनंदाच्या आग्रहावरून मी आई म्हणते; पण म्हणाले, म्हणून त्या आई कशा होतील? आईचं मन कोठून आणतील?

या सासूबाईचं कायमचं एक दुखणं आहे. कायमची एक फुणफुण आहे! ती म्हणजे :

'मला सगळं आयतं मिळालं!'

म्हणजे असं बघा, माझे सासरे सचिवालयात हुद्द्याच्या नोकरीवर आहेत. मुलं दोनच. आनंद आणि बेबीवन्सं. बेबीवन्संचं लग्न झालं आहे. त्यांना पार्ल्याला दामल्यांच्याकडे दिलं आहे.

– आणि आम्ही आपटेमंडळी – आम्ही म्हणजे आम्ही सासरची आपटेमंडळी – मुळातच परिस्थितीनं चांगली होती. आणि आपटे-दामले ही एकारान्त कोकणस्थ मंडळी कशी असतात, हे तुम्हांला ऐकून माहीतच असेल! चप्पल विकत घ्यायला जातील, तर एका चपलेची किंमत विचारतील! आणि मग 'एकदम दोन घेतल्या, तर काही कमी करणार का?' असं नंतर विचारतील! एका चपलेची म्हणजे, एकाच चपलेची किंमत विचारतील, एका चप्पलजोडीची नाही! यांचा आपला खास कोकणस्थी, तिरकस हिशेब, की एका चपलेपेक्षा दोन चपला म्हणजे चप्पलजोड स्वस्त पडले.

ही कोकणस्थ मंडळी अशी असतात ! पै-पैसा वाचणारी.

आमचे तात्या नेहमी म्हणतात,

'जावई जोडावा, तर कोकणस्थ आणि सून आणावी, तर तीही कोकणस्थ! म्हणजे आपल्या मुलीचं साठवलेल्या पैशामुळं छान चालतं आणि काटकसरी, कोकणस्थ सुनेमुळं आपल्या मुलाचा खर्चही कमी होतो!'

आपटेमंडळी राखून ठेवणारी! थेंब पडला, की तो साठवायचा आणि त्याचं तळं बनवायचं, एवढंच त्यांना माहीत.

नाहीतर देशस्थमंडळी – नंबर एकची उधळी.

सांगायचं काय, तर आपट्यांकडची परिस्थिती मुळातच चांगली होती. मामंजीच्या वडिलांपासून. त्यात मामंजींनी भर घातली, त्यात आणखी भर घालावी, अशी आनंदाची इच्छा आहे.

पण माझी इच्छा तशी नाही.

मला वाटतं, की मित्रमंडळींना बोलवावं, दोन पैसे खर्च करावेत, मजा करावी व मनुष्यजन्माचं सार्थक करावं. महागाई ही अशी वाढते आहे, जेवढ्या पैशात आज लिटरभर दूध येतं, तेवढ्या पैशात उद्या बोंडलंभर दूध मिळणार नाही. म्हणून आज लिटरभर दूध पिऊन घ्यावं.

पण आपटेमंडळी रुपयाला रुपया चिकटवत बसणार आणि म्हातारपणी बोंडलंभर दूध पिणार!

ही कोकणस्थ मंडळी बोंडलंभर दूध पिऊन एका लिटरची ढेकर देतील, हा भाग वेगळा.

मी मूळची तारा देशपांडे. देशपांडे म्हणजे देशस्थच, हो. म्हणून तर आमच्या तात्यांनी मला आनंद आपटेवर प्रेम करायला परवानगी दिली.

खरं सांगायचं, तर तात्यांनी परवानगी देण्याआधीच मी आनंदाच्या प्रेमात पडले होते. मी तात्यांची परवानगी नंतर काढली. काही माणसं नाही का प्रथम आत येतात आणि मग विचारतात, 'काय, आत यावं का?' माझं तात्यांना विचारणं तसंच होतं. पण असं विचारावं. दिसायलं बरं दिसतं. वडील माणसांना बरं वाटतं. तात्यांनी परवानगी दिली नसती, तर मग मी आईची परवानगी मागितली असती. दोघांनीही परवानगी दिली नसती, तर मी परवानगीवाचून प्रेम केलं असतं. प्रेम का अशा परवानगीची वाट पाहतं?

आनंदाही माझ्या प्रेमात पडला होता. पहिल्यांदा कोण प्रेमात पडलं होतं?

मला वाटतं की, मी पडली असेन. पण आनंदाच्या प्रेमात नाही, आपटेमंडळींच्या प्रेमात पडले होते.

आमचे सासरे – म्हणजे सासरे होण्यापूर्वीचे सासरे – एक तारखेला बिनचूक आमच्या बँकेत यायचे. आमच्या बँकेत म्हणजे मी नोकरी करते, त्या बँकेत.

आम्हां देशस्थांची कसली बँक असणार? आमचं बँकेत खातं असलं, तरी खूप झालं आणि त्या खात्यात पैसे असले, म्हणजे कहरच झाला! शरद ऋतू, त्यात पौर्णिमेची चांदणी रात असा योग!

मामंजी यायचे, ते स्वतःच्या, सासूबाईंच्या व आनंदाच्या अशा तिघांच्या रिकरिंग खात्यांत पैसे भरायला. पुन्हा या तिघांची सेव्हिंज खाती ती वेगळीच! आणि या सगळ्यात खात्यांत पैसे भरपूर होते.

मी या तिघांच्या खात्यांच्या प्रेमात पडले.

रिकरिंग खात्याची मुदत संपली की, सासरे ते पैसे मुदत ठेवीत गुंतवायचे.

सेव्हिंज खात्यात पाच हजार रुपये असतील, तर पाचशे काढतील! तेही काढताना मामंजी मला विचारायचे,

'खात्यात किती रक्कम आहे?'

'खूप आहेत.' मी म्हणायचे.

'म्हणजे किती?'

'पाच हजार चारशे अठ्ठ्याऐंशी.'

हे ऐकलं की, मामंजी चेकवर पाचशेचे चारशेच करायचं आणि पुटपुटायचे,

'पाच हजाराच्या खाली बॅलन्स जाता कामा नये!'

नाही तर देशपांडे तात्या! म्हणजे आमचे तात्या - माझे वडील!

चेक लिहिण्यापूर्वी खात्यात किती कमीत कमी रक्कम ठेवावी लागते, हे विचारतील आणि उरलेली सर्व काढतील.

या आपट्यांची प्रत्येकाची वेगवेगळ्या तऱ्हेची वेगवेगळी खाती आणि प्रत्येक खात्यात पाच हजार रुपये हवेतच, असा आपटेनियम!

आमच्या देशपांड्यांकडे तात्यांचं एकमेव खातं व ते तळात फुटलेल्या बादलीसारखं.

आपटेमंडळींच्या या खात्यांच्यात मी प्रथम प्रेमात पडले होते.

- आणि एके दिवशी आपटेकुलोत्पन्न आनंद आपटे म्हणजे आजचे माझे मिस्टर बँकेत आले.

काय, ग बाई चालण्याची ऐट, बोलण्याची ऐट! खातं असं हे एकनूर आणि खातेदार हा असा दसनूर!

माझ्या लक्षात आलं की, मी प्रेमात पडले आहे.

मी एकदम सावध झाले आणि बावळट दिसायला लागले.

तात्यांनी मला तसं सांगूनच ठेवलं होतं.

मी बावळट, धांदरट, वेंधळी अशी मुळीच नाही. मी चांगली पक्की आहे.

तात्या म्हणतात,

'ही तारी देशस्थ आहे, हे मला खरंच वाटत नाही. एवढी बदमाश मुलगी आणि देशस्थांत? हॉस्पिटलात बाळंतपणाच्या वेळी अदलाबदल होऊन कोकणास्थाची पोरगी बदलून तर आपल्या घरी आली नाही? तारे, तुला बजावून ठेवतो! मुलीच्या जातीनं इतकं सुरेख असावयास हरकत नाही, पण चेहऱ्यावर एवढं उघड उघड बदमाश दिसू नये! तुला पाहिलं, की कोणीही अंदाज बांधेल, की ही पोरगी चलाख, धोरणी, बेरकी, चाणाक्ष, धूर्त, पाताळधुंडी आहे... आणि त्याचा अंदाज चुकला, म्हणजे तो ओरडत माझ्याकडे येईल. अंदाज चुकेल, म्हणजे काय, तर आपल्याला वाटलं, त्याहून किती तरी पटीनं ही पोरगी च-धो-बे-चा-धू-पा आहे, हे त्याच्या ध्यानी येईल आणि त्याची बोबडी वळेल. तारे, चेहऱ्यावर नेहमी बावळट भाव ठेव. बावळटपणानं वाग. धूर्तपणा लपव, तरच तुझा या जगात निभाव लागेल. आहेस, तशीच दिसलीस, तर एक जण तुझ्या जवळ फिरकणार नाही. उघड्या डोळ्यानं कोण तेज पाहील?'

त्यामुळं मी आनंदाला पाहिलं, त्याच्या प्रेमात पडले आणि मुद्दामच बावळट, वेंधळी दिसण्याचा व्यापार मांडला.

सरावानं मात्र बावरणं, गोंधळणं छान जमतं.

मुळात जर आपण चलाख, तरतरीत असलो आणि आपण जर भोळसट, भोट, गोंधळलेले आहोत, असं दाखवायला यत्न केला, तर आपण आहोत, त्यापेक्षा अधिकच सुंदर, लोभस दिसतो, म्हणे!

हे मला, खरं तर, माहीत नव्हतं.

श्रावणात ऊन-पावसाचा खेळ असतो, तसा खेळ चेहऱ्यावर उमटतो, म्हणे! उजेडाची अंधाराची किंवा सुरेलपणाची, नीरव, सुखद शांततेची पाठशिवणी चालल्यासारखी वाटते म्हणे.

कधी तरतरीत, कधी संभ्रमित, कधी उत्तेजित, कधी लज्जित असे भाव चेहऱ्यावर उमटतात, म्हणे.

म्हणे, म्हणजे आनंदा म्हणे. त्यानं चिठ्ठी पाठवून माझी वेळ घेऊन कॉफीसाठी मला 'रुचिरा'त नेलं, तेव्हा त्यानंच मला हे सारं सांगितलं.

मी कुमारी आहे, माझं कुठं लग्न ठरलेलं नाही आणि मी कुठं गुंतलेली नाही, याची खातरजमा करुन घेतल्यावर आनंदानं मला काय काय सांगितलं, ग, बाई!

म्हणे, आगीनं आपण कसं पोळतो हे अग्नीला कळत नाही. पण जिथं अग्नीची आच लागते, त्याचे, म्हणे, प्राण वाचत नाहीत!

म्हणे, आपल्या तीक्ष्णपणानं दुसऱ्याचा कसा घात होतो, हे हत्याराला काय माहीत?

विषाला आपण किती प्राणघातक आहोत, याचा कुठं अंदाज असतो?

हे सगळं पहिल्या भेटीत आनंदा म्हणाला होता.

हा आनंदा एवढा खुळा आणि भाबडा, की या पहिल्या भेटीतच मी तुमच्या प्रेमात पडले आहे, मी तुमच्यावाचून जगू शकणार नाही. माझ्याशी लग्न कराल का? असं बोलून बसला.

मी घाईघाईनं चेहऱ्यावर उमटून पाहणारा अधिरेपणा, आनंद पूर्णपणे लपवला. चेहऱ्यावर लज्जेचा व गोंधळाचा दाट थर पसरला. आणि विचारलं,

'एवढं माझ्यात काय आढळलं तुम्हांला?'

'पुढच्या भेटीत सांगेन.' आनंदा म्हणाला.

किती, ग बाई, ही कोकणस्थ हुशारी! म्हणजे यानं पुढची भेट नक्की करून घेतली!

आम्हां देशस्थांच्या अंगी कुठली एवढी चातुरी?

दुसऱ्या भेटीत हा भाटासारखा बडबडायलाच लागला. माझं

BELVALKAR HOUSING

नाक-नव्हे नासिका (आनंदा म्हणाला की, इतरांना नाक असतं, तुम्हांला फक्त नासिका आहे!) माझे डोळे, माझी कपाळपट्टी... कप्पाळ माझं! जेवढे म्हणून माझे अवयव या आनंदाला अनावृत दिसले होते, तेवढ्यांचं हा वर्णन करत सुटला.

बरं, तर बरं, माझी आई मला अघळपघळ अंगभर कपडे घालायला लावते. त्यामुळं लग्नानंतर वर्णन करायला चार अवयव तरी उरले!

-आणि या दुसऱ्या भेटीत वर्णन करता-करता आनंदा माझ्या केसांपाशी आला आणि केसांतच अडकून राहिला.

लग्नानंतर मी पाहते आहे, तर आनंदा अजून माझ्या केसांत आहे.

न्हाऊन, खांदे भरून केस मोकळे सोडून मी आरशासमोर बसले की, मीच माझ्या प्रेमात पडते.

आनंदा तडफडेल, यात नवल काय?

आनंदाच्या जिवाची घालमेल मी आरशात चोरटेपणानं पाहते. मला ती बघवत नाही.

आनंदा म्हणतो,

'नीता, न्हालीस, की सूर्य चकचकीत व्हावा, तशी चकाकतेस, मोहर फुटलेल्या कल्पलतेप्रमाणे गंधित होतेस!'

हा वेडा असं म्हणतो आणि मला चक्क साष्टांग नमस्कार घालतो...

हा नमस्कार तुझ्या नासिकेला
हा नमस्कार तुझ्या गालांना
हा नमस्कार तुझ्या रसाळ जिभेला
हा नमस्कार तुझ्या मोरपिशी बोटांना
हा नमस्कार तुझ्या साधेपणाला

- आणि हे सगळे नमस्कार स्वीकारताना मला अवघडल्यासारखं वाटतं... तसं बरंही वाटतं!

आनंदाच्या आरोग्याचा विचार करता, असे एकशे आठ नमस्कार त्यानं घालावेत, असंही मनात येतं.

सांगायचा मुद्दा काय, तर आनंदा ह्या पहिल्या भेटीपासून ते लग्न होईपर्यंत, लग्न झाल्यापासून ते हनीमून संपेपर्यंत, हनीमून संपल्यापासून ते दिवाळसणापर्यंत, दिवाळसणापासून ते लग्नाच्या पहिल्या वाढदिवसांपर्यंत आणि आजपर्यंत माझा दासानुदास होऊन बसला आहे.

आनंदानं विश्वासात घेऊन मला सांगून ठेवलं आहे,

'नीता, असं सांगणं कमीपणाचं आहे, पण मी न राहवून सांगतो. मला तुझं सरळ सरळ वेड लागलं आहे! मी तुझा नवरा नाही, प्रियकर नाही, मित्र नाही, मी तुझा भक्त आहे! पण मी तुझ्या एवढा मुठीत अडकलो आहे, याचा माझ्या आईला पत्ता लागू देऊ नकोस. जमलं, तर तू, 'मी कसा छळवादी, तिरसट, कडक व कटकट्या आहे', हे माझ्या आईच्या कानांवर घालत जा...

'मुख्य म्हणजे, तुझ्या पगारातील एक पैसाही खर्च करू नकोस. तू अशी कंजूषपणानं वागलीस की, बाबा तुझ्यावर बेहद्द खूश होतील. आणि तुला काय पाहिजे, ते तू मला सांग, तू मागशील; ते मी तुला देईन, पण तुझा पैसा खर्चू नकोस!'

मी आनंदाला एकही प्रश्न विचारला नाही. होयबासारखी 'होय' म्हणाले. 'तुझ्या शब्दाबाहेर नाही' असं म्हणाले.

-आणि यात नाही म्हणण्याजोगं होतंच काय? माझ्या फायद्याचंच होतं की. तरी मी माझ्या चेहऱ्यावर आनंद न दाखवता, बावळटपणानं होय म्हणाले.

आनंदानं एक नमस्कार माझ्या साधेपणाला म्हणजे बावळट-पणाला उगाच का घातला होता?

नवऱ्यांना चलाख बायका आवडत नाहीत. त्यांना हव्या असतात सुंदर आणि हो ला हो म्हणणाऱ्या ठोंब्या बायका.

आमच्या तात्यांना माझी आई कुठं आवडते?

आमचे तात्या ठोकून देणारे आहेत. तात्यांच्या दहा गोष्टींतील पाच बाता असतात.

आईला खोटेपणा आवडत नाही.

इतिहास म्हणजे घडून गेलेल्या गोष्टी. त्या तरी आपण बदलू नयेत.

तात्या इतिहासही त्यांच्या सोयीप्रमाणे घडवतात! आई लगेच शुद्धिपत्रकाचं काम करते. तिनं चारचौघात तात्यांना ठोकलंच.

'अहो, मस्तानीवाला बाजीराव पराक्रमी होता तो ब्रिटिशांच्या स्वाधीन राज्य करून ब्रह्मवर्ताला गेला नाही. बाईच्या नादी लागलं, की राज्यं जातात, हा तुमचा निष्कर्षही चुकीचा आणि वर दाखलाही चुकीचा...

'अहो, दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ. ही तुमची म्हण बरोबर आहे; पण टिळक-आगरकर यांच्या भांडणामुळं ब्रिटिशांची सत्ता बळकट झाली. असलं काही चमत्कारिक बोलू नका! या दोघांचा वाद होता राजकीय चळवळ व सामाजिक चळवळ यांत जास्त महत्त्व कशाला द्यायचं, याबाबत या वादामुळं सामाजिक चळवळ मागं पडली. असं फार तर म्हणा!' इति आई.

पूर्वी तात्यांच्या दहा गोष्टींतील दहाही बाता असायच्या, आईच्या ठोकण्यामुळं हे प्रमाण आता पाचावर आलं आहे.

तात्या आईला नेहमी म्हणतात,

'तू जरा कमी शहाणी, कमी हुशार असतीस, तर काय बहार झाली असती आणि मूर्ख असतीस, तर मला विलक्षण आवडली

असतीस!..'

माझी आई त्यावर ठसक्यात उत्तर देते.

आवडते, त्याहूनही जास्त आवडून करायचंय काय? न आवडताही चार मुलं झाली. त्यात आणखी भर पडली असती! आणि मी तर तुमच्यासारखी बाताडी थापाडी असते, तर ते मलाच आवडलं नसतं. तुम्हांला आवडण्यापेक्षा मी माझी मला आवडणं हे जास्त महत्त्वाचं!'

पण मला आईचं म्हणणं पटत नाही.

आपलं आपल्याला आवडून काय उपयोग?

आरशातील आपल्या नाकावरून आपणच हात फिरवायचा, का आपल्या पिंगट डोळ्यांकडे आपणच पाहत बसायचं? का आपल्या केसांत आपणच आपली मान खुपसायची?

आपण आनंदाला आवडण्यातच खरी मजा आहे. आपण आपल्याला कसे साष्टांग नमस्कार घालायचे? आरशासमोर उभं राहून आपल्या प्रतिबिंबाला? तेही शक्य नाही. आपण साष्टांग नमस्कार घालावा, तर आपलं प्रतिबिंबही आपल्या मूर्खपणाला नमस्कार घालतं.

आपण आनंदाला आवडणं हे महत्त्वाचं आहे, अगत्याचं पण आहे.

आनंदाला आवडायचं, म्हणजे थोडं बावळटच दिसायला हवं. तरतरीतपणा, चलाखी घडी करून बासनातच ठेवायला हवी. आनंदा म्हणेल, त्याला, आपल्याला सोयीचं असेल तेव्हा, चटकन 'होय' म्हणायला हवं.

मी नुसतं आनंदाचं ऐकते. एवढंच नव्हे, तर तसं वागतेही.

त्यामुळं आनंदाच्या आज्ञेप्रमाणे मी माझा सगळा पगार बँकेत माझ्या खात्यात टाकते. एकही पैसा खर्च करत नाही आणि मला 'काय काय हवं', याची यादी आनंदाकडे देते. आनंदा सगळं आणून देतो, विसरतेपणी चार वस्तू जास्तच आणतो. कमी नाही.

आनंदाचा वाढता उधळेपणा पाहून सासूबाई, मामंजी आनंदाला बोलतात. मला फार वाईट वाटतं. कान झाकून घ्यावेसे वाटतात. आनंदाच्या माघारी, आनंदाच्या आज्ञेनुसार मला सासूबाईंकडे चहाडी करावीच लागते.

'आनंद नंबर एकचा हेकट आहे. नंबर दोनचा हट्टी, नको म्हणाले, तरी कानांत घालण्यासाठी किती प्रकारचे अलंकार आणतो. साड्या आणतो, सेंटच्या बाटल्यांवर पैसे उधळतो. मला बँकेतून परस्पर किडनॅप करुन उंची हॉटेलात घेऊन जातो. नाटक बघायची सक्ती करतो, शनिवारी-रविवारी निवांत विश्रांती घ्यावी, असं योजावं, तर हा माथेरान-लोणावळा अशा ठिकाणी मला तंगडतोड करावयाला लावतो, मला नको नको झालं आहे!'

हे सगळं तक्रारीच्या सुरात मी सांगत असते.

दुसऱ्या दिवशी मी आनंदाकडे नव्या मागणीचा कागद देते.

आनंदाच्या इच्छेबाहेर वागायचं नाही, हे मी ठरवून टाकलं आहे.

माझ्या मनाविरुद्ध, केवळ आनंदाच्या इच्छेखातर मी एवढं करते, याचं सासूबाईंना काही कौतुक आहे का? शेवटी सासूबाई, त्या सासूबाई, आणि आई, ती आई!

माहेरी गेल्यावर आईलाही मी हेच सांगते, अशाच तक्रारीच्या सुरात सांगते.

यावर माझी आई म्हणते,

'अग, आनंदराव हौशी आहेत. त्यांना बायकोच्या रूपगुणाचं कौतुक आहे. सगळेच काही बाताडे नसतात. काही करणारेही असतात.'

पण सासूबाईंना काडीचंही कौतुक नाही, काडीचीही सहानुभूती नाही.

माझं कौतुक कशाकरता हवं, तर त्यांच्या मुलासाठी मी माझ्या मनाविरुद्ध वागते, यासाठी; आणि सहानुभूती हवी त्याचसाठी, मी माझं मन मारते, यासाठी.

त्या आतून तिरकसपणानं आणि वरवर सरळपणानं मला कशा म्हणतात,

'अग, आयतं मिळालं, तरी आपणच विचार करावा - काय घ्यावं आणि काय घेऊ नये, याचा! प्रेमविवाह म्हटला की, सगळाच आनंद! आनंदानं हट्टच धरला. प्रत्येक बाबतीत आम्हांला माघार घ्यावी लागली! एकच मुलगा, मग काय करणार? देशस्थ व कोकणस्थ असा विचार न मानणाऱ्या पुढारलेल्या विचारांची मी आहे, हा भाग वेगळा; पण लग्न तरी थाटामाटात व्हायला हवं ना? त्या निमित्तानं चार माणसं येतात, जुन्या ओळखी; नव्या होतात; पण तिथंही आनंदाचा हेका! म्हणे, आई, तुला एवढ्या ओळखीपाळखी वाढवायच्या आहेत ना? वाढव, पण ते तुझ्या खर्चानं. देशपांड्यांच्याकडच्या पैशानं नाही. आपल्या माणसांचा खर्च आपणच करायचा. काय करणार? माघार घेतली. 'मुलीच्या अंगावर देशपांडे काय दागिने घालणार, याची चौकशी कर', असं मी सुचवलं, तर तिथंही या आनंदाचा तिढाच! माझं बोलणं रीतीचं होतं! दागिन्यांचे उगाच दोनदोन जोड होतील, म्हणून सावधगिरी घ्यायला नको? हा आनंदा तुझ्या वडिलांसमोर, लग्न ठरवायच्या वेळी मला म्हणतो, 'अग आई, दोन दोन जोड झाले, तर देशपांडे त्यांचे दागिने परत नेतील. त्यांना आणखी दोन मुली आहेत! त्यांच्या लग्नाच्या वेळी त्यांना हे उपयोगी पडतील.' मग देशपांडे कशाला दागिने घालतील? त्यांनी नाहीच घातले.'

सासूबाई हे एवढं सलगपणे बोलल्या, म्हणता काय? असं हे

BELVALKAR HOUSING

औपरोधिक, टोचरंबोचरं बोलणंही त्यांना सहजपणे, एका दमात बोलता येत नाही.

येता-जाता एखादं-दुसरं वाक्य बोलतील. मग अडखळतील. आपण तिष्ठत बसायचं. मग यांचं दुसरं वाक्य बाहेर पडायचं.

पण सगळ्या बोलण्याचा मतितार्थ एकच. काय? तर : मला हे सगळं आयतं मिळालं.

पण आम्ही देशपांड्यांनी ठरवाठरवीच्या वेळी अडवणुकीच्या शब्दाचा तरी उच्चार केला का?

आम्ही सगळं करायला तयार होतो. दोन्हींकडचा खर्च आम्हांला पेलवलणार नव्हता, तरी तो आम्ही करणार होतोच ना? अंगावर दागिने घालणं आम्हांला परवडणारं नव्हतं, तरी पण तात्या 'आम्ही दागिने घालू' असं म्हणालेच ना?

हनीमूनकरता दार्जिलिंगला पाठवण्याची तयारी तात्यांनी दाखवली होतीच की!

पण यांचा मुलगा आनंदा हा हट्टी-हेकट. आपलं तेच खरं करणारा निघाला, त्याला आम्ही देशपांडेमंडळी काय करणार, बाई?

हां! लग्नाआधी मी आनंदाला एवढं मात्र कॉफी हाऊसमध्ये खाजगीत म्हणाले होते खरं!

'आनंदा, माझंही तुझ्यावर प्रेम आहे, रे!'

पण प्रेम असणं आणि ते सफळ होणं यांत शंभर अडचणी आहेत. आणि त्या शंभर अडचणींचा बाप आहे पैसा. माझे वडील लग्नखर्च करू शकणार नाहीत, आणि तुम्ही आपटे-मंडळी अशी भरपेट श्रीमंत आहात! तू एकुलता एक, तुझं लग्न थाटात करावं, असं तुझ्या घरच्यांना वाटणं हे अगदी साहजिकच आहे. आणि तुम्ही फिक्स्ड डिपॉझिट्स मोडून काही लग्न करणार नाही. पण काळजी करू नकोस. पुढच्या जन्मी आम्हीही कोकणस्थ असू, आमच्याही मुदत-ठेवी असतील. मी सगळ्या ठेवी, मुदतीच्या पूर्वी व्याज बुडवून तुझ्यासाठी मोडेन आणि तुझ्याशीच लग्न करेन. पण पुढल्या जन्मी! या जन्मी हे लग्नाचं जमणं कठीण वाटतं आहे!'

हे बोलताना माझ्या चेहऱ्यावर मी तरतरीतपणा, चलाखी यांनी येऊ देतेच कशाला? आणि आनंदा ताडकन म्हणाला,

'तारा, मी तुझ्याशीच लग्न करीन! मला एकही पैसा तुमच्याकडून नको आहे. मी सगळ्या मुदतठेवी मोडायला लावीन आणि तुझ्याशीच लग्न करीन!'

'हे असं तू घरी जाऊन म्हणशील आणि मी मात्र जन्माची संकटात सापडेन. तुझ्या आईवडिलांचा माझ्यावर कायमचा डूख राहील. तू असं काहीही घरी बोलू नकोस! आमचे तात्या तुमच्याकडे येतील. आमचे तात्या म्हणतील की, 'आम्ही दोन्हींकडचा खर्च करू, मुलीच्या अंगावर रीतसर दागिने घालू, मानपान करू...'

- आणि तू म्हणायचं, 'मुलीकडून आम्हांला एक छदामही नको. तुमच्या सर्व अटी मागं घ्या, तरच हे लग्न होईल!'

आनंदा जोरजोरानं मान हलवून होय म्हणाला आणि माझे तात्या लग्न ठरवायला गेले, तेव्हा मी पढवल्याप्रमाणं हा पोपट तावातावानं बोलला की!

सासूबाईंच्याप्रमाणे अडखळत, शब्दाशब्दावर ठेचकाळत नव्हे, तर एका दमात, घडाघडा आणि रुबाबात.

माझे तात्या थक्क झाले! मला घरी सांगत आले,

'तारे, तू ऐकायला हवं होतंस! अग, तुला नवरा नव्हे, हीरो मिळाला. काय उच्च विचार! काय प्रगल्भपणा! काय नि:स्पृहता! तुझ्या नवऱ्याच्या तोंडून शब्द नव्हे, तर महान मंत्र बाहेर पडत होते!'

मी तात्यांना या कटात सामील करून घेतलं नव्हतं. आमचे तात्या, म्हणजे देशपांडे. म्हणजे देशस्थ. नंबर एकचे अव्यवहारी आणि उधळे. माझ्याखाली आपल्याला आणखी दोन मुली आहेत, हे विसरले असते आणि माझ्या लग्नावर सगळे पैसे खर्चून बसले असते.

- आणि म्हणून तात्यांचा बैठकीचा अहवाल ऐकल्यावर मीही डोळे आश्चर्यानं फडफडवले. ओठांचा चंबू केला. दाट केसांचा लांब शेपटा चार वेळा पाठीमागून पुढं ओढला आणि पुढून मागं टाकला आणि न उडणारे केस सहा वेळा सावरले.

हे असं मी आनंदाच्यासमोर केलं असतं, तर आनंदानं दहा दंडवत घातले असते.

तात्यांना आपल्या मुलीचं काय कौतुक. त्यांच्या तोंडी 'आनंदा एके आनंदा, आनंदा दुणे आनंदा!'

म्हणजे सगळं प्लॅनिंग माझं, पैसे वाचवले मी आणि श्रेय माझ्या आनंदाला!

माझ्या आनंदाला म्हणाले मी? खरंच आहे. श्रेय मला मिळालं काय आणि आनंदाला मिळालं काय? अर्थ एकच.

नाही, नाही! खरं तर, श्रेय आनंदाचंच आहे. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवायला सांगण्यात माझं काय जातंय्?

तात्या म्हणाले,

'आनंदाच्या बोलण्यातील आवेश पाहून आनंदाचे आईवडील थक्क झाले!'

काय उपयोग थक्क होऊन? सासूबाई आनंदापासून काही शिकल्या का?

आनंदा माझ्याशी लग्नाआधीपासून ते आजपर्यंत किती किती तऱ्हेचं, वेगवेगळं प्रेमाचं, लाडीगोडीचं अस्खलितपणे, न दमता, न थकता बोलत असतो! पण सासूबाईंना काही हे जमत नाही, हे

BELVALKAR HOUSING

तर झालंच, पण तिरकसपणानंसुद्धा एका दमात बोलता येत नाही.

म्हणे, आनंदाचं बोलणं ऐकून थक्क झाले!

आनंदाकडून, कसं बोलावं, हे शिकायचं नसेल, तर फुकटचं थक्क होऊन उपयोग काय?

सासूबाईंचं बोलणं तुटक व तुटकं पण.

मीच ते समजून घ्यायचं.

येऊन जाऊन काय सांगायचं? तर, म्हणे, एखाद्याला, नशीब चांगलं असलं, की सगळं आयतं मिळतं.

मी मान खाली घालून, शालीनपणानं सासूबाईंना म्हणते,

'तुमचं म्हणणं खरंच आहे. माझं नशीब थोर, म्हणून मला सगळं आयतं मिळालं. एक आई माहेरी सोडून आले, तर सासरी दुसरी आईच मिळाली! आणि आनंदासारखा संस्कारी नवरा तुमच्यामुळंच मिळाला. मुलावर संस्कार शेवटी आईच करते की! आनंदा एवढा उदार विचारसरणीचा झाला आहेख तो तुमच्या–मुळंचना! आनंदा खूप म्हणाला असेल, की आपल्या मुलीकडचं आपल्याला काहीच नको. घरोघरी नाही, तरी शंभरांतील दहा घरांत तरी आनंदासारखे तरुण असतीलच की! पण त्या तरुणांच्या आया आडव्या येत असणार. आणि त्यांच्या सुनांना काही म्हणजे, काही आयतं मिळत नसणार, पण तुम्ही वेगळ्या आहात!...

'आपल्या बेबीवन्सं पाहा ना! किती गुणी आहेत! तुमचेच संस्कार, विचार, आचार जस्सेच्या तस्से उचलले आहेत त्यांनी! पण दामल्यांना काय त्याचं? दामल्यांनी लग्नात सगळं वाजवून घेतलं, म्हणे! बेबीवन्संचे मिस्टर किती खेळकर आहेत. पण त्यांच्या आईनं त्यांना लग्नात स्कूटरचा हट्ट धरायला शिकवला, म्हणे! आनंदनं लग्नात तीन चाकी सायकलचाही हट्ट केला नाही. मला सगळं आयतं मिळालं.'

हे बोलताना मी माझ्या चेहऱ्यावर शालीनता, नम्रता, धन्यता यांचं असं प्रदर्शन मांडलं होतं – त्या प्रदर्शनाच्या उद्घाटनाला कोणा तरी मंत्र्यालाच बोलवायला हवं होतं! मंत्र्यांच्या चेहऱ्यावर असेच भाव असतात! माझ्या या बोलण्यावर सासूबाई गप्पच होतात. अडखळत बोलायचंही विसरून जातात.

मग मीही काही बोलत नाही!

पण माझं मन आतून बोलत असतं,

'सासूबाई, या जगात कोणीही कोणाला काही आयतं देत नाही. मला हे आयतं मिळालं, असं तुम्हांला वरवर वाटतं; पण हे काय आयतं मिळालं आहे? यामागं कष्ट आहेत, ध्यास आहे, अभ्यास आहे, अभिनय आहे....

'तुमचा मुलगा शंभरांतील एक! एकुलता एक आणि श्रीमंत! त्याला आपल्या प्रेमात पाडायचं, हे काय येरागबाळ्याचं काम आहे...?

'आपण आनंदाच्या प्रेमात पडायचं, त्याला आपल्या पाशांत गुंतवायचं, आपण प्रेमात पडायचं; पण न वाहता स्थिर राहायचं! आनंदाला मात्र प्रवाहाच्या बाहेर येऊ द्यायचं नाही व बुडूनही द्यायचं नाही... हे साधणं काय सोपं आहे...?

'आनंद आपल्यात पक्का गुंतला आहे, हे वेळच्या वेळी ओळखायचं आणि मगच त्याला सांगायचं, 'आनंदा, आपल्या प्रेमात पैसा भिंतीसारखा आडवा येणार!' आणि आनंदाकडून आपल्याला पाहिजे ते संवाद अभिनयासकट वदवून घेणं हे काय सोपं आहे?...

'एवढं आपण करायचं; पण याचं श्रेय मात्र आपण घ्यायचं नाही! माझ्या वडिलांचे एवढे पैसे मी वाचवले – होय, मीच वाचवले; पण श्रेय मात्र आनंदाला मिळालं. तात्या आनंदाचं कौतुक करतात. त्यालाच मोठेपणा देतात! एकदा तरी या सर्व व्यापाराची सूत्रधार मी आहे, हे सांगण्याच्या मोहात मी पडले का? हा मोह टाळणं काय सोपं आहे?

'मी हे असं का करवलं, का घडवलं? तर हे असंच घडावयास हवं, म्हणून! प्रत्येक आनंदानं आपली आपली माहेरची तारा व सासरची नीता हुंड्याशिवाय, मानपानाशिवायच स्वीकारावयास हवी! एक मुलगी आपलं माहेर सोडून नव्या घरात लक्ष्मी म्हणून येते. तिचं स्वागत कराल, का तिच्याकडून प्रवेश फीची मागणी कराल? कायद्यानं हुंडा घेता येत नाही. पण कायदा न पाळणारे आहेतच ना? मी आपटे कुटुंबाकडून कायद्याचा मान राखवला व त्याचं श्रेयही मी स्वत:कडे न ओढता आपटे कुटुंबाकडंच ठेवलं... हे साधं आहे?...

'आणि मी पुन्हा माझा तरतरीतपणा लपवते आणि वर बावळटपणा मिरवते...

'माणसाला नसलेली हुशारी मिरवायची असते आणि आपला बावळटपणा लपवायचा असतो! मी कायम शीर्षासन करून आहे! तरतरीतपणा खाली आणि बावळटपणाची पताका वर!...

'हे सोपं आहे?'

माझी आई ज्ञानेश्वरीतील एक ओवी आमच्या तात्यांना ऐकवते:

'चातुर्य लपवी । महत्त्व हारवी ।
पिसेपण मिरवी । आवडोनि ।

असं माणसानं वागावं, असं माझी आई म्हणते !

अंतरीच्या नाना कळा लपवणं आणि वरचा बावळेपणा मिरवणं याला अभिमानाचा अभाव म्हणजे अमानित्व, असं भगवान श्रीकृष्णानं गीतेत म्हटलं आहे, असं माझी आई म्हणते. ही, म्हणे, ज्ञानाची खूण आहे.

–आणि आमच्या सासूबाई! गीता-ज्ञानेश्वरी हे तर त्यांना माहीत नाहीये. वर त्या रमी खेळतात आणि त्यात हरतात.

BELVALKAR HOUSING

आमच्या आईपुढं सासूबाई आणि कल्पकतेपुढं कोरांटी, अमृतधारेपुढं पाणी, परिसापुढं लोखंड आणि चिंतामणी रत्नापुढं रस्त्यावरची खडी.

-आणि अशा माझ्या आईविषयी निश्चयपूर्वक मी एकही भला शब्द घरात आणि आनंदाजवळ उच्चारत नाही. का तर आनंदाला वाईट वाटू नये, म्हणून.

हे सोपं आहे?

या सासूबाई मला येता-जाता 'आयतं मिळालं', असं जाणवून देतात. पण मी एका शब्दानं सासूबाईंना दुखवत नाही. मला आयतं मिळालं, हे कबूल करते.

का, तर सासूबाईंना दुखवलं, तर आनंदा दुखावेल.

-आणि भरीस भर, म्हणून सोन्यासारख्या माझ्या नवऱ्याविषयी 'तो हेकट आहे, हट्टी आहे, तो उधळ्या आहे', हे सासूबाईंच्या जवळ बोलताना माझ्या जिभेला किती यातना होतात, हे तुम्हांला कळेल हो, पण सासूबाईंना कळणार नाही. त्या यातना मी सोसते.

-आणि सासूबाई म्हणतात की,

'मला सगळं आयतं मिळतं आहे!'

तरीही मी सासूबाईंना 'आई' म्हणते.

त्यांचं उपरोधाचं बोलणं मी मन स्थिर ठेवून ऐकते, सहन करते.

-आणि वर सासूबाईंचं कुशल चिंतते. का?

काहीही झालं, तरी, सासूबाई कशाही असल्या, तरी त्यांनी नऊ महिने भार वाहून आनंदाला माझ्यापर्यंत पोचवलं आहे, हे मी कशी विसरेन?

– 'शंभर धागे प्रेमाचे' मधून साभार

***

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :

https://youtu.be/rlSv2API1Ag

# समतेचें हें तुफान उठलें

**– विंदा करंदीकर**

ऊठ ऊठ सह्याद्रे, घुमवित बोल मराठी खडे;
समतेचें हें तुफान उठलें; उठले सागरकडे.

हीच मराठी जिच्या मुखानें बदली ज्ञानेश्वरी;
शिवबानें तरवार घासली याच मराठीवरी;
हिच्या स्वागतासाठीं झडले तोफांचे चौघडे.

टिळक, गोखले, फुले, रानडे, आगरकर वैखरी
स्वातंत्र्याच्या पांच मशाली जळती वेदीवरी;
ह्या ज्योतीवर दीप पेटवा चला भविष्याकडे.

स्वतंत्रतेचा मंत्र जयांना गर्भामध्यें मिळे,
तेच मराठे आम्ही; आम्ही सह्याद्रीचे सुळे;
स्वराज्यांतुनी पुढें चला रे, चला सुराज्याकडे.

दर्याच्या भरतीच्या लाटा महाराष्ट्रअंगना
कंकणनादा भिउनि तयांच्या शत्रु सोडिती रणा;
वीज माळुनी वेणीवरतीं त्याही घुसल्या पुढें.

ऊठ खेडुता, पुन्हां एकदां झाडुनियां घोंगडी;
ऊठ मजूरा, पुन्हां मारण्या आघाडीवर उडी;
एकजूट ही पाहुन पडतिल अन्यायाला तडे.

(....साभार)

ऐकण्यासाठी क्लिक करा ही लिंक :

https://youtu.be/vgajMsxsBTs

BELVALKAR HOUSING

AISI AKSHARE RNI NO. MAHMAR-24315/13/1/2003-TC PHM/SR/201/VIII/05




आपल्या माणसांनी प्रत्येक घर शुभंकर करणारे बेलवलकर डेव्हलपर्स सादर करीत आहे, पुण्यातल्या मोक्याच्या ठिकाणी सिंहगड रोडवरील पु. ल. देशपांडे उद्यानासमोरचा, 300+ परिवार नांदत असलेल्या 'सरिता वैभव'चा शेवटचा फेज. जिथे फुलते आहे, खऱ्या वैभवाने झळाळणारी आनंदी, समाधानी सुखसंपन्न जीवनशैली!

**शेवटचे काहीच फ्लॅटस् शिल्लक. आजच संपर्क साधा.**

BELVALKAR HOUSING
प्रत्येक घर शुभंकर

**संपर्क - 90110 10811**

बी 9 आणि 10, सरिता वैभव, पु. ल. देशपांडे, उद्यानासमोर, सिंहगड रोड, पुणे - 411 030. www.belvalkarhousing.com

MahaRERA No.: "B9 & B10" - P52100016093. Available at website: https://maharera.mahaonline.gov.in